# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### रायगड जिल्हयातील पशुसंवर्धन विभागात अनुभवी व अर्हताप्राप्त डॉक्टरांची नियुक्ती करण्याबाबत

**(१) ३२४४६ (०७-०१-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयामधील पशुधनाचे योग्य जतन व संगोपन तसेच शासनाच्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन विभागात अनुभवी व अर्हताप्राप्त डॉक्टरांची नियुक्ती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पशुसंवर्धन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पशुसंवर्धन विभागाच्या रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत एकूण १०० पदवीधारक / पदव्युत्तर अर्हता धारक 'पशुसंवर्धन पर्यवेक्षक' या निम्नश्रेणी पदावर मागील १० ते १२ वर्षे कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील श्रेणी दोन पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी एक मध्ये दर्जावाढ करण्याचा निर्णय शासनाने माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेतल्याने सुमारे ४४० पशुवैद्यकीय अधिकारी पदांची आयोगामार्फत सुरू असलेली भरती प्रक्रिया मात्र सेवानिवृत्ती व अन्य कारणांमुळे सुमारे ५२५ पदे अद्यापपर्यंत रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पशुसंवर्धन पर्यवेक्षक ही रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याचे ठरविण्यात आल्यामुळे प्रत्यक्ष शासन सेवेत कार्यरत अनुभवी अर्हताप्राप्त पशुसंवर्धन पर्यवेक्षकांना पशुवैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नती देणे अपेक्षित असताना त्यामध्ये त्यांना डावलले जात असल्याने त्या कर्मचाऱ्यांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषगांने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पशुसंवर्धन विभागात अनुभवी व अर्हताप्राप्त डॉक्टरांची नियुक्ती करण्याबाबत व पशुसंवर्धन पर्यवेक्षकांना पशुवैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नती देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०१-२०२३) :** (१) व (२) पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गातील ४२८ रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबत पदस्थापना शासन आदेश दिनांक ०८/०२/२०२२ निर्गमित करण्यात आले असून, सदर रिक्त पदे भरण्यात आलेली आहेत.

तथापि रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात येवून पशुपालकांना नियमितपणे आवश्यक पशुवैद्यकीय सेवा नियमितपणे पुरविण्यात येत आहेत. पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद रायगड अंतर्गत एकूण ७९ पशुधन पर्यवेक्षकांची पदे मंजूर असून सद्यस्थितीत ३८ पदे भरलेली आहेत यापैकी ४ पशुधन पर्यवेक्षक पदवीधारक असून, ते सन २००३ व २००६ पासून कार्यरत आहेत.

(३) व (४) राज्यात नवीन पशुवैद्यकीय दवाखाने सुरु करणे, दवाखान्यांची दर्जावाढ करणे या अनुषंगाने आढावा घेण्याबाबत शासन निर्णय दिनांक ०७/१२/२०२१ अन्वये समिती गठीत करण्यात आलेली असून, सदर समितीचा परिपूर्ण अहवाल प्राप्त झाल्यानंतर या संदर्भात कार्यवाही करणे संकल्पित आहे.

पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गातील ४२८ रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबत पदस्थापना शासन आदेश दिनांक ०८/०२/२०२२ निर्गमित करण्यात आले असून, सदर रिक्त पदे भरण्यात आलेली आहेत. बाह्य स्त्रोतांद्वारे

तात्पुरत्या स्वरुपात २६२ पशुधन पर्यवेक्षकांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यास दिनांक २१/०३/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदरचे मनुष्यबळ निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यांच्या कालावधीकरीता उपलब्ध करुन घेण्यात आले आहे. या अनुषंगाने नियमित स्वरुपातील पदोन्नती प्रक्रियेला कोणात्याही स्वरुपाचा अडथळा उद्भवत नाही.
(५) व (६) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २९८ रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात क्र. १२/२०२२ प्रसिद्ध करण्यात आली असून, लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यास त्याद्वारे रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे. तसेच आयुक्त पशुसंवर्धन यांच्या दिनांक ३१/०७/२०२१ व दिनांक ०५/०८/२०२१ रोजीच्या आदेशान्वये १२५ पशुधन पर्यवेक्षकांना सहायक पशुधन विकास अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.

---

## दाजीपूर (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) अभयारण्याच्या पर्यटन विकासास मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२) ३२५१२ (१२-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दाजीपूर (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) वन्यजीव अभयारण्याच्या पर्यटन विकासाकरीता मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११ डिसेंबर, २०२० रोजी वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीमध्ये या अभयारण्याच्या पर्यटन विकासाकरीता ११० कोटी रुपयांच्या आराखड्यास तत्वत: मंजूरी देवून पहिल्या टप्यातील कामाकरीता २५ कोटी रुपयांच्या निधीस मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर यांच्याकडून मंजूर २५ कोटी रुपयांचा प्रस्ताव, अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षण (वन्यजीव) पश्चिम, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रस्तावास त्वरीत मंजूरी देवून निधी उपलब्ध होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-१२-२०२२) :** (१) दाजीपूर अभयारण्य पर्यटनदृष्ट्या विकासीत करण्याच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११ डिसेंबर, २०२० रोजी वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीमध्ये विभागीय वन अधिकारी, वन्यजीव, कोल्हापूर यांनी सादरीकरण केले. सदर बैठकीमध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांनी प्रथम टप्प्यात करावयाच्या कामाकरीता रु.२५ कोटीची तरतूद करण्यात यावी असे निर्देश दिले. तसेच प्रस्तावित कामे करण्याकरीता आवश्यक विकास आराखडा तयार करुन त्यास निसर्ग पर्यटन मंडळ, नागपूर यांचे मंजूरीकरीता सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
(२) व (३) दाजीपूर (ता.राधानगरी,जि.कोल्हापूर) वन्यजीव अभयारण्य या निसर्ग पर्यटन स्थळाचा आराखडा महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६.१२.२०२१ रोजीच्या सभेत सन २०२१-२२ ते २०२५-२६ या वर्षासाठी मंजूर झालेला असून, आराखडयाची एकूण किंमत रु.१७५९.२९ लक्ष आहे. त्यास अनुसरुन सन २०२२-२३ मध्ये विविध कामांकरीता रु.२८१.२७३ लक्षचा अनुदान मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. सदर प्रस्तावाची छाननी करुन आवश्यक कामांकरीता रु.१२४.८४ लक्ष इतका निधी शासन निर्णय दिनांक १६.११.२०२२ अन्वये वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील आरे कॉलनीमधील अंतर्गत रस्त्यांच्या विकासाकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(३) ३५४११ (०२-०२-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरे वसाहतीमधील २७ आदिवासी पाडयांना जवळपास ४५ कि.मी. लांबीच्या अंतर्गत रस्त्यांची दुरूस्ती करण्याकरिता एम.डी.आर अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान नगरविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन सादर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्ते हे आदिवासी पाड्यांना जोडणारे असून देखभाल दुरूस्तीअभावी या रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झालेली असून या रस्त्यांवर पथदिवेही नसल्याची बाब निदर्शनास आली असून या ठिकाणी पथदिव्यांअभावी असणाऱ्या अंधारामुळे मागील काही महिन्यात या ठिकाणी बिबट्याचा संचार वाढला असून बिबटयाने हल्ला केल्याच्या ७-८ घटना घडल्या असून या प्रकरणी पथदिवे सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे व पथदिवे बंद असल्यामुळे या भागातील आदिवासी नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत, रात्री-अपरात्री वैद्यकीय सुविधेकरिता जाण्याकरिता अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून वेळप्रसंगी नागरिकांना वेळेवर उपचार न मिळाल्याने जीवही गमवावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू रस्त्यांच्या देखभाल दुरूस्ती व पथदिव्यांअभावी स्थानिक आदिवासी नागरिकांना होत असलेला त्रास लक्षात घेता, सदरहू रस्ते हे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत तसेच रस्त्यांच्या विकास व दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच सदरहू रस्ते बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे शक्य नसल्यास, सदरहू रस्त्यांची मालकी ही शासनाकडेच ठेवून केवळ देखभाल दुरूस्तीकरिता सदरहू रस्ते बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत शासनाची भूमिका काय असून त्यानुषंगाने शासनाने सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) आरे वसाहतीत सुमारे ४५ कि.मी. लांबीचे अंतर्गत रस्ते आहेत. उप अभियंता (विद्युत) यांच्याकडून एकूण ३१२ पथदिवे बसविण्यात आले आहेत.

आरे वसाहतीतील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी रुपये ४८ कोटी इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाने तांत्रिक मान्यता दिली असून, प्रशासकीय मान्यता तसेच वित्तीय तरतूद करण्यासाठी प्रस्ताव वित्त विभागास पुरवणी मागणीद्वारे दिनांक १६/११/२०२२ रोजी सादर करण्यात आला आहे. पुरवणी मागणी मान्य झाल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## खुपटा (जि. औरंगाबाद) येथील सामाजिक वनीकरण विभागाने बनावट वृक्ष लागवड केल्याबाबत

**(४) ३९९६० (१८-०४-२०२२). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुपटा (जि. औरंगाबाद) येथील सामाजिक वनीकरण विभागाने वृक्ष लागवड करतांना दिनांक १ जुलै, २०१९ रोजी अकरा हजार, दुसऱ्या वर्षी दिनांक २० जून, २०२० रोजी तेच खड्डे दाखवून अकरा हजार अशी बावीस हजार वृक्षांची बोगस लागवड केल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अजिंठा-बुलढाणा राज्य रस्त्यावरील पुलाखाली झुडुपाआड काळया रंगाच्या पिशव्यांमध्ये रोप फेकण्यात आल्याचे एका वृत्तपत्राच्या सर्वेक्षणात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बोगस वृक्ष लागवड प्रकरणाची चौकशी करण्याबाबत जिल्हा परिषद सदस्यांकडून मागणी करण्यात

आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सर्व प्रकरणाची चौकशी करुन जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-१२-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही. तथापि, वृत्तपत्राच्या सर्वेक्षणानुषंगाने चौकशी केली असता, सदर रोपे ही निलगिरी जातीची असल्याचे निदर्शनास आले असून सिल्लोड सामाजिक वनीकरण परिक्षेत्रातील रोपवाटीकेत निलगिरीची रोपे तयार केलेबाबत कुठलीही नोंद नाही. सबब, सदर वृत्तपत्रातील बातमीमधील नमूद रोपांबाबत कुठलाही संबंध सामाजिक वनीकरण विभागाशी असल्याचे दिसून येत नाही.
(३) श्री. गजानन दत्तात्रय राऊत, जिल्हा परिषद सदस्य, औरंगाबाद यांच्या दिनांक ८.१०.२०२१ व दिनांक ३१.०१.२०२२ रोजीचे तक्रार अर्ज सामाजिक वनीकरण विभाग, औरंगाबाद यांना प्राप्त झाले आहेत.
(४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशीअंती कोणताही गैरप्रकार आढळून आला नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती वनविभागात कॅम्पाअंतर्गत निधीच्या रोखलेख्यात झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(५) ४१२५१ (१८-०४-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती वन विभागाने कॅम्पा अंतर्गत प्राप्त निधीच्या रोखलेख्याच्या छाननी दरम्यान निधी खर्चात ताळमेळीत अभाव असल्याचे दिनांक २१ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर छाननी दरम्यान सीआरसी प्रमाणे उप वनसरंक्षकानी खर्च केलेला नसणे, लेखाशिर्षानुसार खर्च केलेला नसणे, रोपवनाच्या कामात दरपत्रके रेट लिस्टचा अभाव असणे, दगडी नाला बांधकामे अंदाजपत्रकानुसार नसणे , प्रमाणकात रोपवनांची टक्केवारी नसणे, वनतळे खोदतळ्याचे मोजमाप नसणे, विविध साहित्य खरेदीची प्रमाणकानुसार देयके अदा केलेली नसणे इत्यादी मुद्दे महा कॅम्पाच्या अधिकाऱ्यामार्फत निदर्शनास आणून दिलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आयकर वसूलीसह अंदाजपत्रकानुसार विकास कामे झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशींतर्गत दोषी वनाधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०१-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही. तथापि, अमरावती वन विभागाच्या कॅम्पा अंतर्गत प्राप्त निधीच्या माहे मार्च, २०२१ च्या रोखलेख्याची छाननी राज्य कॅम्पा कार्यालयाद्वारे माहे जुलै, २०२१ मध्ये करण्यात आली होती. त्यामध्ये सीआरसी कोडप्रमाणे खर्चाचे वर्गीकरण केलेले नसणे, खरेदी केलेल्या साहित्यांचा नोंदी साठा नोंदवही (Stock Book) मध्ये घेण्यात आलेल्या नसणे, साहित्य खरेदीचे बीले प्रमाणाकासोबत जोडली नसणे., साहित्य खरेदीसाठी निधी वाटप केलेला नसतांना साहित्य खरेदी करणे व प्रमाणाकावर संवितरण अधिकाऱ्याची स्वाक्षरी नसणे, हे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. सदर आक्षेपांची पूर्तता करण्यात आली असून भविष्यात अशी पुनरावर्ती होणार नाही याबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दौंड (जि.पुणे) तालुक्यातील यवत, पाटस, वरवंड व देऊळगाव राजे येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी २ चे श्रेणी १ मध्ये करण्याबाबत**

**(६) ४२००१ (०५-०४-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील यवत, पाटस, वरवंड व देऊळगाव राजे येथे शेतकरी कुटुंबे राहत असून पाळीव पशूंची संख्या मोठ्या प्रमाणवर असल्याने तेथील पशुवैद्यकीय दवाखानाचे श्रेणी २ मधून श्रेणी १ मध्ये श्रेणीवर्धन करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त दवाखान्याचे श्रेणी १ मध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१) होय.

(२) राज्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०७/१२/२०२१ अन्वये एका समितीचे गठण करण्यात आलेले असून, सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने पुढील उचित कार्यवाही संकल्पित आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यात पशुसंवर्धन विषयक सेवा-सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(७) ४२६४१ (०७-०४-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतीपुरक पशुपालनासाठी प्रोत्साहन दिले जात असताना अमरावती जिल्ह्यात मात्र पशुसंवर्धन विषयक सेवा-सुविधांचा अभाव असल्याने राज्याच्या जलसंपदा राज्यमंत्री महोदयांनी पशुसंवर्धन आयुक्तांना पत्र लिहून हा कारभार सुधारावा अशी सूचना केल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती येथील पशुवैद्यकीय दवाखान्यातील एक्स-रे मशीन ही गेल्या १२ वर्षापासून बंद असून तसेच सोनोग्राफी मशिनसुद्धा बंद असल्यामुळे जनावरांवर उपचार करणे पशुपालकांना शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील पशुसंवर्धन विभागाच्या सर्व दवाखान्याची आढावा बैठक घेऊन मुलभूत सेवासुविधा आणि रिक्त पदे तात्काळ भरून शासन पशुपालकांना दिलासा देणार काय?

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-१२-२०२२) :** (१) अमरावती जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यातील सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत तत्कालीन मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांनी आयुक्त पशुसंवर्धन यांना माहे जानेवरी, २०२२ मध्ये पत्र पाठवून सूचना दिल्या आहेत.

(२) जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्साल्य अमरावती येथील एक्सरे मशीन नादुरुस्त झाली होती. सदर मशीन माहे जानेवारी, २०२२ मध्ये दुरुस्त करण्यात आली आहे. तसेच जुने सोनोग्राफी मशीन दुरुस्त होत नसल्यामुळे या दवाखान्यासाठी नवीन सोनोग्राफी मशीन उपलब्ध करून देण्यात आली आहे.

(३) व (४) शासन आदेश दिनांक ८.२.२०२२ अन्वये एकूण ४२८ नवीन पशुधन विकास अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, यापैकी अमरावती जिल्ह्यामध्ये एकूण १३ पशुधन विकास अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच पशुवैद्यकीय दवाखान्यांतील रिक्त पदांचा अतिरीक्त कार्यभार नजीकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला असून याव्दारे पशुपालकांना मुलभूत पशुसंवर्धन विषयक सेवा सुविधा पुरविण्यात येत आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाव्दारे जाहीरात क्रमांक ११/२०२२ (अनुशेष विशेष भरती) नुसार १२ पशुधन विकास

अधिकाऱ्यांची शासनास शिफारस प्राप्त झाली असून त्यांची कागदपत्र पडताळणी करुन नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाव्दारे विज्ञापित जाहीरात क्रमांक १२/२०२२ नुसार २९८ पदे सरळसेवेने भरण्याची कार्यवाही सुरू आहे, सदर उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर आवश्यकतेनुसार रिक्त पदे भरण्याचे संकल्पीत आहे. वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ०४.०५.२०२० अन्वये नवीन पद भरती न करण्याबाबत निर्देश असल्यामुळे तात्पुरत्या स्वरुपात बाह्यस्त्रोतांव्दारे २६२ पशुधन पर्यवेक्षकांची पदे भरण्यात आली आहेत. तद्नंतर राज्यात उद्भवलेल्या लम्पी चर्मरोग प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक बाब म्हणून पशुधन पर्यवेक्षक ११५९ व पशुधन विकास अधिकारी २९३ इतके मनुष्यबळ तात्पुरत्या स्वरुपात बाह्यस्त्रोतांव्दारे उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे. दरम्यानच्या कालावधीत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ३१.१०.२०२२ अन्वये पद भरती वरील निर्बंध शिथील करण्यात आले असून याअनुषंगाने गट-क व गट-ड संवर्गातील पदभरती करण्याचे संकल्पीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ शासकीय कृषी कर्मचारी गृहनिर्माण सहकारी पतसंस्था रजि.न.१८७/७८ झालेल्या नियमबाहय कामाच्या चौकशीबाबत**

**(८) ४३२९७ (०९-०४-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ येथील कृषी कर्मचारी सहकारी पंतसंस्था रजि.न.१८७/७८ यवतमाळ संस्थेतील सभासदाने संस्थेतील इतर सदस्यांना विचारात न घेता जाहीरात प्रसिध्दी न करता संस्थेच्या मालकीचा प्लाटची विक्री केली तसेच निवीदा न काढता हॉलचे बांधकाम केले अशी अनेक नियमबाहय कामे केली असल्याने इतर सदस्यांनी या बाबत तक्रार दिली असल्याचे दिनांक २० जानेवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय?
(२) असल्यास, सहायक उपनिबंधक यवतमाळ यांनी कर्मचारी गृहनिर्माण सहकारी पतसंस्थाचे संचालक मंडळ बरखास्त करुन देखील अधिकार नसतांना संस्थेत अनेक नियमबाह्य कामे केली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नियमबाहय काम करणा-या संबधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४ नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०५-१२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळवा-खारेगाव (जि.ठाणे) येथील शासकीय जमिनीवरील बेकायदा झोपड्या व विविध बेकायदा बांधकाम निष्कासित करण्याबाबत**

**(९) ४४५८१ (३१-१०-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळवा-खारेगाव (जि.ठाणे) येथे विविध शासकीय कार्यालये एकत्रित उभारण्याचा प्रकल्प तत्कालीन आघाडी सरकारच्या काळात मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जागेवर ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्यालय, महसूल विभागाच्या विविध कार्यालयाची उभारणी करण्याचे नियोजित होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तत्कालीन मुख्यमंत्री यांनी युतीचे सरकार येताच सदर निर्णय बदलून या मध्यवर्ती जागेवर जागतिक

दर्जाचे व्यावसायीक संकुल उभारण्याचा निर्णय घेऊन महानगर विकास प्राधिकरणाने या जागेच्या सर्वेक्षणाचे काम हाती घेतले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासकीय मालकीची मुळ जमिन ११० एकरची असतांना मात्र शासकीय यंत्रणाच्या दुर्लक्षामुळे त्यापैकी ३८ एकर जमिनीवर यापूर्वीच झोपडपट्टया आणि बेकायदा चाळींचे बांधकाम झाले असून, उर्वरीत संरक्षित जागेवरही गेल्या कांही वर्षात बेसुमार बेकायदा बांधकामे उभी राहीली आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मोठ्या प्रमाणात होत असलेली बेकायदा बांधकामे, खारफुटीचा संरक्षित भाग तसेच किनारपट्टी अधिनियम क्षेत्रामुळे जागतीक व्यावसायिक संकुलाचा महत्वाकांक्षी प्रकल्प होऊ शकत नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त संरक्षित जमीन बेकायदेशीररित्या घेण्याच्या प्रकाराची महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, उक्त चौकशी पूर्ण करण्यात आली आहे काय व त्यानुषंगाने या शासकीय जमिनीवरील बेकायदा झोपड्या व विविध बेकायदा बांधकाम निष्कासित करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१), (२), (३), (४), (५), (६) व (७) मौजे कळवा, ता. जि. ठाणे येथील अंदाजे ३९.५५.६० हे. आर जमीन खारलॅन्ड अ‍ॅक्ट, १९४८ चे कलम २० अन्वये खारभूमी डॅव्हलपमेंट बोर्ड यांच्या नावे दाखल झाली होती. तदनंतर सदर जमिनीपैकी अंदाजे ३-४१.६० हे. आर व ३५-८६.४० हे. आर जमीन अनुक्रमे "महाराष्ट्र शासन" व पाटबंधारे विभागाकडे वर्ग झाली आहे. पाटबंधारे विभागाच्या नावे असलेल्या जमिनीपैकी २८२७८१.०० चौ. मी. जमीन शासन ज्ञापन महसूल व वन विभाग, दिनांक २९.०३.२०१२ व जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेश दिनांक २६.०९.२०१२ अन्वये जिल्हा परिषद, महसूल विभाग, सामाजिक न्याय भवन, सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत पारेषण कंपनी, ठाणे महानगरपालिका, क्रिडा विभाग अशा विविध विभागांना मागणी केलेल्या प्रयोजनाकरीता हस्तांतरीत करण्यात आली आहे.

मौजे कळवा, ता. जि. ठाणे येथील जमिनीवर ठाणे जिल्ह्यातील विविध प्रशासकीय प्रकल्प राबविण्याबाबत तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०.०१.२०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदयांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या मदतीने सदर जमिनीवर सेंट्रल बिझनेस डिस्ट्रिक चा बृहत आराखडा तयार करून घेण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

मौजे कळवा येथील पाटबंधारे विभागाच्या नावे असलेल्या जमिनीपैकी काही जमिनीवर पाटबंधारे विभागाची बांधकामे आहेत. तसेच काही जमीन सी. आर. झेड. ने बाधीत आहे. पाटबंधारे विभागाची बांधकामे व सी. आर. झेड बाधीत जमीन वगळता उर्वरीत ५.०० हे. आर जमीन ग्रोथ सेंटरसाठी शिल्लक राहत असून सदर जमिनीवर ग्रोथ सेंटर विकसित करणे नियोजनाच्या दृष्टीने शक्य नाही, असे प्रमुख, नियोजन विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांना दिनांक २६.०३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दिनांक २६.०९.२०१२ रोजीच्या आदेशानुसार विविध शासकीय विभाग/कार्यालय यांना वर्ग केलेल्या जमिनीची संबंधित विभागास आवश्यकता आहे किंवा कसे? याबाबत अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिनांक ०७.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

प्रस्तावाधीन जमिनीवरील बेकायदा बांधकामे व चाळींचे अतिक्रमण तसेच जमिनीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या फेरफाराबाबत तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांनी वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिनांक ०४.०५.२०२२ व दिनांक २५.०५.२०२२ रोजी दिले असून त्यानुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

---

## अहमदनगर जिल्ह्यातील सुमारे १६३ पशुवैद्यकीय दवाखान्याचा अनुशेष निर्माण झाल्याबाबत

**(१०) ४५३६१ (२७-१०-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य व केंद्र शासनाच्या निकषानुसार सर्वसाधारण भागात ५ हजार जनावरांमागे एक तर डोंगरी भागात ३ हजार जनावरांमागे एक अशी पशुवैद्यकीय दवाखान्याची आवश्यकता असताना मंजुरी न मिळाल्यामुळे अहमदनगर जिल्ह्यात सुमारे १६५ पशुवैद्यकीय दवाखान्यांचा अनुशेष निर्माण झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात दुग्ध व्यवसाय अग्रेसर असल्याने शेतकरी जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय करीत असताना पशुधनासाठी आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासाठी पशुवैद्यकीय दवाखाने नसल्याने पशुधनांना अडचणींना सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यात सन २०१९ या कालावधीच्या मंजुरीप्रमाणे एकूण २२३ पशुवैद्यकीय दवाखाने असून त्यातील २१६ जिल्हा परिषदेच्या अखत्यारित तर उर्वरित राज्य शासनाच्या अखत्यारीतील दवाखाने आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्ह्यातील वाढती पशुधनाची संख्या लक्षात घेता पशुवैद्यकीय दवाखान्यांची असलेली गरज पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) राज्यात नवीन पशुवैद्यकीय दवाखाने सुरु करणे, दवाखान्यांची दर्जावाढ करणे या अनुषंगाने आढावा घेण्याबाबत शासन निर्णय दिनांक ०७/१२/२०२१ अन्वये समिती गठीत करण्यात आली असून, सदर समितीचा अंतरीम अहवाल प्राप्त झाला आहे. त्यानुषंगाने समितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर या संदर्भात कार्यवाही करणे संकल्पित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक येथे रेडिरेकनरच्या दरामध्ये करण्यात आलेल्या वाढीबाबत

**(११) ४५४२७ (१४-११-२०२२). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सरासरी २.३४% व पुणे महानगरपालिका क्षेत्रात ६.१२% दराने रेडीरेकनरच्या दरामध्ये वाढ केलेली असताना नाशिक महानगरपालिका क्षेत्रात मात्र सन २०२२ करीता १२.१५ % दरवाढ करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई आणि पुण्यामध्ये विकास दर कमी असताना नाशिक येथील रेडी रेकनरच्या दरात मोठ्या प्रमाणावर वाढ करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नाशिक येथील रेडीरेकनरचे दर कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाशिक येथील रेडी रेकनरच्या दरात मोठया प्रमाणात वाढ करण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत:-

दिनांक ०१/०१/२०२० ते दिनांक ३१/१२/२०२१ पर्यंतच्या कालावधीतील उपलब्ध खरेदी-विक्री व्यवहारांचे विश्लेषण, स्थानिक चौकशी तसेच सदनिकांच्या दराबाबतची विविध संकेतस्थळांवर उपलब्ध दर/माहिती तसेच नोंदणी महानिरीक्षक व महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे धोरण.

अ) सदनिकांचे दर, जमीन दर + बांधकाम दर यापेक्षा कमी असल्यास ते जमीन दर + बांधकाम दरा इतके ठेवण्यात यावे.

ब) जमीन दर सदनिका दरांशी तुलना करता २०% पेक्षा कमी असल्यास लगत मुल्य विभागातील जमीन दराचा विचार करुन त्यास ५०% मर्यादेत उचित वाढ देणेत यावी.
क) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील जिल्हानिहाय बांधकामाचे R.C.C. दर विचारात घेता, सदनिका, कार्यालये व दुकाने यांच्या दराचे प्रमाण/गुणोत्तर १:१.१५, १:१.२५ या प्रमाणात नसल्यास तफावत दूर करणे व अशा मुल्य विभागात सदनिकेसाठी खरेदी- विक्री व्यवहारांच्या आधारे दिलेल्या वाढीनुसार कमाल २५% मर्यादेत कार्यालय/दुकाने यांचे दरात वाढ प्रस्तावित करणे.

त्यामुळे नाशिक महानगरपालिका क्षेत्रात सन २०२२-२३ चे वार्षिक मूल्यदर तक्त्यांमध्ये एकूण वाढ १२.१५% झाली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडाळा पूर्व (मुंबई) येथील भारतीय कमला नगर जवळ कांदळवन भूमाफियांकडून नष्ट होत असल्याबाबत**

**(१२) ४५४७८ (२५-०९-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील वडाळा पूर्व येथे भारतीय कमला नगर जवळ कांदळवन क्षेत्रावर अतिक्रमण होण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समुद्र सपाटीपासून जवळ असणाऱ्या या भागावर खाडीलगत असणाऱ्या तिवरांच्या झाडांची मोठ्या प्रमाणात कत्तल करुन भूमाफियांनी अनेक झोपडया उभ्या केल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने कांदळवनांची कत्तल करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-१२-२०२२) :** (१), (२) व (३) मौजे वडाळा पूर्व येथील (सॉल्ट पॅन) न.भु.क्र. ८३ मधील ११.४६ हे. आर क्षेत्र राखीव वन असून सदर क्षेत्राचे संवर्धन करण्यासाठी विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटकाचे क्षेत्रिय कर्मचारी व महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान तैनात आहेत. सद्यस्थितीत सदर क्षेत्रावर कोणतेही अतिक्रमण नसून सदर क्षेत्राचे संरक्षण करण्यात येत आहे. त्यामुळे त्यावर अतिक्रमण होण्याची शक्यता नाही.

तसेच, मौजे वडाळा पूर्व येथील (सॉल्ट पॅन) न.भु.क्र. मधील ११.२७ हे. आर क्षेत्र शासनाच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी तात्पुरत्या स्वरुपात एम.एम.आर.डी .ए. यांच्याकडे संरक्षणासाठी हस्तांतरीत केले असून २०१७ मध्ये सदर क्षेत्रावर झालेल्या झोपड्यांवर वन विभाग, महसूल विभाग, पोलीस विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका व एम.एम.आर.डी.ए. यांच्याव्दारे संयुक्त अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील पशुवैद्यकिय दवाखान्यात अनेक वर्षापासून पदे रिक्त असल्याबाबत**

**(१३) ४५५४८ (२७-१०-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील पशुवैद्यकिय दवाखान्यात मागील अनेक वर्षापासून पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पशुवैद्यकिय दवाखान्यात पदे रिक्त असल्याने या विभागाच्या कामावर परिणाम होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विभागात मोठया प्रमाणात पदे रिक्त राहण्या मागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरहू पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०१-२०२३) :** (१), (२) व (३) रत्नागिरी जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची मंजूर, भरलेली व रिक्त पदांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे-

| पद | मंजूर | भरलेली | रिक्त |
|---|---|---|---|
| सहायक आयुक्त पशुसंवर्धन | ०८ | ०२ | ०६ |
| पशुधन विकास अधिकारी | ४२ | १८ | २४ |
| सहायक पशुधन विकास अधिकारी | २२ | २० | ०२ |
| पशुधन पर्यवेक्षक | १६० | ३६ | १२४ |
| कंत्राटी पशुधन पर्यवेक्षक | ११० | ९१ | १९ |
| एकूण | ३४२ | १६७ | १७५ |

विभागातील कार्यरत अधिकाऱ्यांची बदली, पदोन्नती तसेच सेवानिवृत्ती इ. कारणांमुळे पदे रिक्त आहे. तथापि पशुवैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना नियमीतपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.
(४) व (५) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून, लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यानंतर त्याद्वारे सदरहू रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे. राज्यात उद्भवलेल्या लम्पी चर्मरोग प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक बाब म्हणून पशुधन पर्यवेक्षकांची ११५९ पदे (राज्यस्तर २८६ व जिल्हा परिषदस्तर ८७३) आणि पशुधन विकास अधिकाऱ्यांची २९३ पदे बाह्य स्त्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यास शासन निर्णय दिनांक १६/०९/२०२२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये पदभरतीवरील निर्बंध शिथील करण्यात आल्यामुळे नवीन पदभरतीद्वारे गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.

---

**हंड्याकुंड्या ल.पा.प्रकल्प (ता.चोपडा) या प्रकल्पासाठी वनजमीन मिळण्याबाबत**

**(१४) ४५६७५ (२५-०९-२०२२). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हंड्याकुंड्या ल.पा.प्रकल्प (ता.चोपडा) या प्रस्तावित प्रकल्पास प्रशासकीय मान्यता मिळाली असून प्रकल्पाच्या कामास लागणा-या ३१.४९ हे.आर. वन जमिनीच्या हरकतीमुळे काम अद्याप सुरु करता आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पामध्ये २.५८ द.ल.घ.मी. पाणीसाठी निर्माण होणार असून २८१ हेक्टर जमीनीवर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी ३१.४९ हे.आर वनजमीन मिळण्यासाठीचा प्रस्ताव प्रधान सचिव वनसंरक्षक (हेड ऑफ फॉरेस्ट फोर्स), नागपूर यांच्याकडून प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक ४ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रस्तावास मंजूरी देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १७ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली आहे काय वा सुरु असलेल्या कार्यवाहीची

सद्यःस्थिती काय आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-१२-२०२२) :** (१), (२), (३), (४) व (५) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत हंड्याकुंड्या ल.पा. प्रकल्पासाठी, मौजे देव्हारी, ता. चोपडा येथील ३१.४९ हे.आर. वनजमिन वळतीकरणाचा प्रस्ताव राज्य शासनास प्राप्त झाला होता. सदरचा प्रस्ताव राज्य शासनाच्या शिफारसीसह दिनांक १०.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या मान्यतेस्तव सादर केला असता केंद्र शासनाने दिनांक २५.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये त्रुटी उपस्थित केल्या आहेत. त्यानुषंगाने माहिती प्रकल्प यंत्रणेकडून दिनांक २४.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाली असून, सदरची माहिती केंद्र शासनास पाठविण्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. मा.लोकप्रतिनिधींनी सदर प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांना निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे.

---

**बुलढाणा जिल्ह्यात शासनाने "मातोश्री पाणंद रस्ते" योजना राबविल्याने शेतरस्त्यांचे काम रखडल्याबाबत**

**(१५) ४५९९० (३०-१०-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात शासनाने "मातोश्री पाणंद रस्ते" ही योजना राबवून जिल्हा प्रशासनाकडे निधी वितरित करुनही नियोजनाच्या अभावामुळे सर्व शेतरस्त्यांचे काम रखडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले, त्यानुसार उपरोक्त शेतरस्त्यांची कामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१३-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) मातोश्री पाणंद शेतरस्त्यांची कामे करण्याच्या अनुषंगाने जिल्हास्तरावर व तालुका स्तरावर संबंधीत मा.विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आलेल्या आहेत तसेच आवश्यक ते ठराव सुध्दा घेण्यात आले आहेत.ठराव प्राप्त झालेल्या कामांचे अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहेत. ज्या ठिकाणी मजुर उपलब्ध झालेले आहेत अशा २७ रस्त्यांची कामे सुरु करण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सोलापूर जिल्ह्यातील १२०० सहकारी संस्थांनी गेल्या तीन ते चार वर्षापासून लेखापरीक्षण केले नसल्याबाबत**

**(१६) ४६००६ (०६-१०-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षामध्ये माहे डिसेंबर, २०२१ अखेर एकूण ५०७० संस्थापैकी २३११ संस्थांचे लेखापरिक्षण पुर्ण झालेले असून २७५९ संस्थांचे लेखापरिक्षण अद्याप पूर्ण झालेले नाही, हे खरेआहे काय,

(२) असल्यास, लेखापरिक्षण पूर्ण करण्याकरीता शासन अधिसूचना, दिनांक ०१.१०.२०२१ अन्वये दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंत लेखापरीक्षण पुर्ण करण्यासाठी मुदतवाढ देवून संस्थांचे लेखापरिक्षण तात्काळ पुर्ण करण्याबाबत जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, सोलापूर यांनी दिनांक १७.०१.२०२२ च्या पत्रान्वये संबंधीत लेखापरिक्षकांना नोटीस दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मजूर संख्या, पाणी पुरवठा संस्था, पाणी वाटप संस्था, पाणी उपसा गृहनिर्माण सहकारी संस्था व इतर संस्थांना

कोरोना काळात शासनाकडून मिळणारे अनुदान बंद झाल्याने संस्था डबघाईस आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन लेखापरिक्षण कामे पूर्ण करणेबाबत व संस्थांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१३-१२-२०२२) :** (१) व (२) होय
(३) मजूर सहकारी संस्था, पाणी पुरवठा सहकारी संस्था, पाणी वाटप सहकारी संस्था, पाणी उपसा सहकारी संस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था व इतर सहकारी संस्थांना अनुदान देण्याबाबतची शासनाची कोणतीही योजना नसल्याने, अनुदान बंद झाल्यामुळे सदर संस्था मोडकळीस आल्या असल्याबाबत प्रश्न उद्भवत नाही.
(४) शासनाकडून माहे मार्च २०२२ अखेरपर्यंत एकुण ३५३७ सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण पूर्ण झालेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर तालुक्यात केवळ १७ तलाठी कार्यरत असल्याबाबत.

**(१७) ४६२६८ (२५-१०-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर (जि. पालघर) तालुक्यात दिवसेंदिवस नागरीकरण वाढत असल्याने जनतेची कामे व्हावीत या उद्देशाने शासनाने तलाठी सज्जा व मंडळ अधिकारी वाढविले परंतू मनुष्यबळ न वाढवल्याने तालुक्यात ६३ तलाठी सज्जावर केवळ १७ तलाठी कार्यरत असल्याने महसूलासंदर्भात जनतेची कामे वेळेवर होत नसल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील तलाठी संघटनेकडून अनेक वर्षापासून नव्याने तलाठी भरती व्हावी म्हणून शासनाकडे मागणीचे निवेदन दिलेले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्तप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने राज्यात व विशेषतः पालघर तालुक्यात स्थानिक नागरीकांची गैरसोय टाळण्याकरिता नव्याने तलाठी भरती करून तलाठी पदांवर नियुक्त्या करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२९-१२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) पालघर तालूक्यात तलाठी संवर्गाची एकूण-४२ पदे मंजूर आहेत. त्यापैकी २० पदे कार्यरत व २२ पदे रिक्त आहेत. तसेच पालघर तालुक्यात २२ तलाठी सजे नव्याने निर्माण करण्यात आले आहेत. राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील पदभरतीबाबत मा. राज्यपाल महोदय यांच्या दिनांक ०९/०६/२०१४ रोजीच्या अधिसूचनेच्या अनुषंगाने सन-२०१५ मध्ये पालघर जिल्ह्यातील २५ रिक्त पदांची पदभरती प्रक्रिया सुरु करण्यात आली. तथापि, मा. राज्यपालांच्या उक्त अधिसूचनेच्या अनुषंगाने पालघर जिल्ह्यातील बिगर आदिवासी हक्क बचाव समिती, वाडा यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. ८७८३/२०१४ व ८६२९/२०१५ याचिका दाखल केली. सदर दाखल याचिकेत मा. न्यायालयाने अधिसूचनेतील नमूद पदांची भरतीप्रक्रियेस स्थगिती दिलेली आहे. सदरची स्थगिती अद्याप कायम आहे.

आता शासनाने राज्यात तलाठी संवर्गाची रिक्त असलेली-१०१२ तसेच तलाठी संवर्गाची नव्याने निर्माण करण्यात आलेली-३११० असे एकूण- ४१२२ पदांची तलाठी पद भरती प्रक्रिया करण्यास मान्यता दिलेली आहे.
तसेच राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील पदभरतीबाबत मा. राज्यपाल महोदयांच्या दिनांक २९/०८/२०१९ रोजी नव्याने अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे. सदर अधिसूचनेतील सूचनांनुसार सन-२०१५ मधील पालघर जिल्ह्यातील तलाठी पदभरतीतील उक्त २५ पदे वगळून नव्याने निर्माण केलेली तसेच रिक्त असलेली पदांपैकी एकूण- १३१ पदांबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२२ व दिनांक २१/११/२०२२ मधील मार्गदर्शक

सूचनांनुसार पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**पालघर तालुक्यातील वरई येथे वनविभागाने जेसीबी मशीनच्या सहाय्याने खड्डा खोदण्यात आल्याने स्थानिक शेतकऱ्यांची शेत जमिनीकडे जाण्यासाठी गैरसोय होत असल्याबाबत.**

**(१८) ४६२७२ (२५-०९-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) पालघर तालुक्यातील वरई पारगाव रस्त्याच्या पुर्वेकडील शेतजमिनीकडे जाण्यासाठी अनेक वर्षापासूनचा कच्चा रस्ता वनविभागाने जेसीबी मशीनच्या सहाय्याने खोदल्याने शेतीच्या मशागतीसाठी लागणारे ट्रॅक्टर, नांगर, बैलगाडी आणि शेती योग्य लागणारी अवजारे शेतीवर नेता येत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक शेतकऱ्यांनी ग्रामपंचायतीने वन विभागाला शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याबाबतचे निवेदन दिले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेत जमिनीकडे जाणारा रस्ता वन विभागाने खोदलेला खड्डा बुजवून रस्ता वाहतुकीसाठी तात्काळ सुरु करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक शेतकऱ्यांवर गैरसोय करणाऱ्या वनविभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ;

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही,

पालघर तालुक्यातील वरई पारगाव रस्त्याच्या पुर्वेकडील क्षेत्र हे गुंदावे ते पारगाव रस्त्यावरील पूर्वेस लागून असून, सदर क्षेत्र वनपरिक्षेत्र दहिसर अंतर्गत आहे. या वनक्षेत्रात खैर प्रजातीचे वृक्षसंपदा विपुल प्रमाणात असून, वरई-पारगाव रस्त्याचा आधार घेऊन खैर तस्करांच्या सशस्त्र टोळया रात्रीच्या वेळी वाहनातून येऊन खैर वृक्षाची अवैध तस्करी करत असल्याचे निदर्शनास आल्याने, खैर तस्करीस प्रतिबंधात्मक उपाय व वनसंरक्षणासाठी उपाययोजना करण्याकरिता नगावे संरक्षित वन सर्वे नंबर ७४/१अ मधील खेत्रात चर खोदून वाट बंद केली आहे.

(२) हे खरे आहे,

ग्रामपंचायत नावजे कडून जा.क्र.२१२/२०२१-२२, दिनांक २८.२.२०२२ अन्वये निवेदन दिलेले आहे.

(३) खोदण्यात आलेला चर हा मौजे नगावे संरक्षित वन सर्वे नं.७४/१अ मध्ये खोदला आहे. तक्रार ग्रामपंचायत नावजे मार्फत करण्यात आली आहे. दळणवळणासाठी मौजे नावजे बसस्टॉप येथून समोरुन वांद्री धरणाचे कॅनॉलचा पर्याची रस्ता उपलब्ध आहे. खोदलेला चर व नावजे बसस्टॉप मधील अंतर साधारणपणे १ कि.मी. पर्यंत असून, त्याचा वापर करण्याबाबत ग्रामपंचायत नावजे यांना कळविले आहे.

वनक्षेत्रपाल दहिसर यांच्या अहवालानुसार मौजे नगावे संरक्षित वन सर्वे नं.७४/१अ मध्ये प्रतिबंधात्मक चर खोदल्याने १ वर्षापासून या भागातील राखीव वन कं.नं.१३० मधील खैर वृक्षतोड पूर्णपणे बंद झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पशु वैद्यकीय सेवेत वाढ केल्याने पशुपालकांचे आर्थिक नुकसान होत असल्याबाबत**

**(१९) ४६५२३ (२७-१०-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या पशुसंवर्धन विभागाने पशुवैद्यकीय सेवा शुल्कात जवळपास ७५ टक्क्यांनी वाढ केल्याने पशु पालकांचे आर्थिक नुकसान होत आहे ,हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागाने केलेली दरवाढ रद्द करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३० मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास पशुसंवर्धन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली,वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२६-१२-२०२२) :** (१) शासन निर्णय दिनांक २३.०५.२०२२ अन्वये पशुवैद्यकीय सेवाशुल्कात सन २००० नंतर प्रथमत: सुधारणा करण्यात आलेली आहे. तथापि, सेवाशुल्काचे दर वाढल्यामुळे पशु पालकांचे आर्थिक नुकसान होत असल्याबाबतची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२), (३) व (४) स्थानिक लोकप्रतिनिधींकडून दिनांक ३०.०५.२०२२ रोजी वा त्या सुमारास सेवाशुल्कातील दरवाढ रद्द करणेबाबतची मागणी केल्याचे दिसून येत नाही. परंतु आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांचे कार्यालयाकडे काही पशुपालकांनी दिनांक २३.०७.२०२२ च्या निवेदनाद्वारे शासन निर्णयात योग्य बदल करून उपचार शुल्क कमी करण्याविषयी विनंती केलेली आहे.

सन २००० नंतर पशुवैद्यकीय उपचारासाठी आवश्यक विविध औषधी, रसायणे, किट्स इ.च्या किंमतीत वाढ झालेली आहे. पशुरूग्णाचे तात्काळ रोगनिदान होण्याच्या अनुषंगाने अधिक तज्ञतेच्या सेवा विभागाकडून दिल्या जात आहेत.

---

## महात्मा फुले कर्जमाफी योजनेतील वंचित पात्र कर्जदारांना कर्जमाफीचा लाभ मिळण्याबाबत

**(२०) ४६५२७ (१०-११-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :**सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा फुले कर्ज माफी योजनेची घोषणा होऊन दीड वर्षाचा कालावधी पूर्ण होऊन देखील राज्यभरातील अनेक पात्र शेतकरी अजूनही कर्जमाफी पासून वंचित असल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ न मिळालेल्या नव्याने कर्ज सुद्धा मिळत नसल्याने बँक वसुलीसाठी तगादा लावत असल्याने त्यांना तातडीने कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी बुलढाणा जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी तहसीलदार सहा निबंधक, जिल्हा उपनिबंधक जिल्हाधिकारी यांच्याकडे वारंवार करीत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील १.७८ लाख शेतकऱ्यांनी प्रमाणीकरणासाठी उपलब्ध असून त्यापैकी १.७४ लाख शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. त्यापैकी १.७१ लाख शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये रुपये ११३०.३९ कोटी कर्जमाफीची रक्कम वर्ग करण्यात आली असून आधार प्रमाणीकरण झालेल्या शेतकऱ्यांपैकी २७७५ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात कर्जमाफीची रक्कम वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे हे खरे आहे काय
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तात्काळ कर्जमाफी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. अतुल सावे (०९-१२-२०२२) :** (१) व (२) नाही.
(३) व (४) होय.
महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ या योजनेअंतर्गत बुलडाणा जिल्ह्यातील १,७९,०८४ शेतकऱ्यांची कर्जखाती विशिष्ट क्रमांकासह आधार प्रमाणीकरणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. त्यापैकी १,७५,८५८ कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेले असून १,७४,७४० कर्जखात्यांमध्ये कर्जमाफीची रक्कम जमा

करण्यात आलेली आहे.
तसेच योजनेच्या निकषांनुसार अपात्र कर्जखाती वगळून १११८ कर्जखात्यांवर कर्जमाफीची रक्कम जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती वन विभागाची संयुक्त वनव्यवस्थापक समितीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२१) ४६५४० (२५-०९-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती वन विभागाच्या संयुक्त वनव्यवस्थापक समितीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य व प्रधान सचिव, मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म.रा.,नागपूर यांना दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी (धामनगांव रेल्वे) यांनी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती मधील प्रशासकीय, वित्तीय क्षेत्रीय, तांत्रिक व इतर सर्व अनियमियततेबाबत सखोल चौकशी करून संबंधीतांवर शिस्तभंगाची दंडनीय कारवाई करण्याबाबत पत्र देऊनही व आदेशीत करूनही विहीत मुदतीत अथवा विलंब अधिनियम २००५ कलम १० (१) व १० (२) नुसार आज तारखेपर्यंत कोणतेही चौकशी न करता दोषी अधिकारी व कर्मचा-यांना पुरावे नष्ट करण्याकरीता वरीष्ठ अधिकारी सतत सहकार्य करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित विकासक व अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-१२-२०२२) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
अ) नागरी संयुक्त वनव्यवस्थापन समिती, अमरावती चे पदाधिकारी यांनी केलेल्या आर्थिक गैरव्यवहार, अनियमितता प्रकरणी सहाय्यक वनसंरक्षक (कॅम्पा व वन्यजीव) अमरावती यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली होती. वनपरिक्षेत्र वडाळी अंतर्गत संयुक्त वनव्यवस्थापन समिती मार्फत सन २०१५-१६ मध्ये बांबू उद्यानात करण्यात आलेल्या रस्त्याच्या कामात झालेल्या वित्तीय अनियमिततेप्रकरणी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती यांनी तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक), वडाळी यांचेविरुध्द विभागीय चौकशीअंती दिनांक ०२/१२/२०१९ रोजीच्या आदेशान्वये शिक्षा बजावली आहे.
ब) तसेच बांबू वन उद्यानात सन २०१५-१६ मध्ये करण्यात आलेल्या रस्त्याचे कामात कंत्राटदारांना अदा करण्यात आलेल्या जास्तीच्या रकमेपैकी रु.४,७३,५७४/- इतकी रक्कम संबंधित कंत्राटदारांकडून वसूल करण्यात आलेली असून उर्वरित रु.१९.६२ लक्ष इतकी रक्कम संबंधित कंत्राटदारांकडून वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.
क) त्याचप्रमाणे ऑक्सीजन पार्क, अमरावती व बांबू वन उद्यानातील रस्त्याचे कामात आर्थिक अनियमितताबाबत तत्कालीन उपवनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती यांच्याविरुध्द अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९६९ चे नियम १० अंतर्गत प्रारुप दोषारोपपत्र आवश्यक कार्यवाहीस सादर करण्यात आलेले आहे.
मा. लोकप्रतिनिधी यांच्याकडून प्राप्त निवेदन व इतर प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावरून चौकशी करुन नियमानुसार कार्यवाही करण्यात आली आहे व त्याबाबतचे अहवाल मा.लोकप्रतिनिधींना सादर केलेले आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

---

**राज्यात कुशल राशी वापरण्याच्या हेतूने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामांना मंजुरी देण्याबाबत**

**(२२) ४६५५८ (२७-१०-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अतिरिक्त उपलब्ध कुशल राशी वापरण्याच्या हेतूने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सिमेंट रस्ते, पेव्हर ब्लॉक, सीएनबी स्मशानभूमी कामाकरीता धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे व नांदगाव खंडेश्वर या तालुक्यातील (जि.अमरावती) कामांना मंजुरी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (धामनगाव रेल्वे) यांनी तत्कालीन रोजगार हमी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू कामांना मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१३-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर पत्र शासनस्तरावर आर्थिक वर्षाच्या अखेरीस प्राप्त झाल्याने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामधील अमरावती जिल्ह्यातील अतिरिक्त कुशल घटकांतर्गतच्या कामांच्या नियोजनामध्ये सदर पत्रातील कामे सुचविण्याबाबतची कार्यवाही करणे शक्य झाले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती वन विभागांतर्गत मौजा कासारखेडा, (ता.धामणगाव रेल्वे) येथील स्व.उत्तमराव पाटील उद्यानास मान्यता देण्याबाबत**

**(२३) ४६५५९ (२५-०९-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक वनीकरण, अमरावती वन विभागांतर्गत मौजा कासारखेडा, (ता.धामणगाव रेल्वे) येथील स्व.उत्तमराव पाटील उद्यानास मान्यता देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वने मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ११ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उद्यानास मान्यता मिळण्याबाबत लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत उक्त मागणीनुसार उद्यानास परवानगी देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

श्री.अरुणभाऊ अडसड, तत्का.मा. विधानपरिषद सदस्य यांनी मौ. कासारखेडा, ता.धामणगाव येथे "स्व. उत्तमराव पाटील वन उद्यान निर्मितीमुळे सदर परिसरात रोजगार निर्माण होईल तसेच सदर परिसरात महाविद्यालय असल्यामुळे पर्यटनास उपयुक्त ठिकाण होईल" अशी विनंती दिनांक ११.१.२०२० रोजीच्या पत्रान्वये श्री.संजय राठोड, तत्का. मा. मंत्री (वने), यांना केलेली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

उक्त उद्यान निर्मितीबाबत श्री. अरुणभाऊ अडसड, तत्का. मा. विधानपरिषद सदस्य यांनी दिनांक ०९.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये श्री.सुधीर मुनगंटीवार, मा. मंत्री (वने) यांना विनंती केली असून श्री. प्रताप अरुणभाऊ अडसड, मा.विधानसभा सदस्य यांनी दिनांक २०.१०.२०२० रोजीच्या पत्रान्वये श्री. संजय राठोड, तत्का.मा. वनमंत्री, यांना विनंती केलेली आहे.

(३) व (४) उपरोक्त नमूद लोकप्रतिनिधींच्या विनंतीनुषंगाने अमरावती वन विभागांतर्गत मौ. कासारखेडा, ता. धामणगांव रेल्वे येथील "स्व. उत्तमराव पाटील जैवविविधता वन उद्यान निर्मिती" या योजनेंतर्गत वन उद्यान निर्माण करणे ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**नळदुर्ग (ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद) येथे अतिरिक्त तहसिल कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(२४) ४६६१२ (२७-१०-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नळदुर्ग (ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद) येथे अतिरिक्त तहसिल कार्यालय सुरु करण्याबाबत स्थानिक नागरिक तसेच लोकप्रतिनिधीनी लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे तसेच तुळजापूर तालुक्यात १२३ गावे व २ मोठी शहरे आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील तालुक्याच्या विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांचे अध्यक्षतेखाली तालुका पूर्नरचना समिती गठीत करण्यात आली असून सदरहु समितीचा तालुका निर्मिती पुर्नरचना करण्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अतिरिक्त तहसिल कार्यालय अद्याप मंजूर न करण्याचे कारणे काय आहेत, याबाबत चौकशी करून नळदुर्ग येथे अतिरिक्त तहसिल कार्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी वित्त विभागाने राज्यातील तालुक्यांच्या विभाजनांच्या अनुषंगाने नव्याने निकष ठरविण्यासाठी नवीन समिती गठीत करुन त्यांच्या शिफारशी प्राप्त करुन त्यानुसार तालुका विभाजनाची कार्यवाही प्रस्तावित करणे उचित होईल या प्रमाणे अभिप्राय दिले आहेत. त्यास अनुसरुन तालुका पुनर्रचना समिती स्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) नळदुर्ग येथे अपर तहसिल कार्यालय सुरू करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून वित्त विभागाच्या सहमतीने व शासन मान्यतेने त्यावर निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य कृषी मूल्य आयोगाची नेमणूक करण्याबाबत**

**(२५) ४६७३१ (०१-११-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतमालाला किफायतशीर भाव मिळावेत व ग्राहकांना वाजवी दरात शेतमाल खरेदी करता यावा या दुहेरी उद्देशाने राज्य कृषी मूल्य आयोगाची निर्मिती करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयान्वये राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्त्या दिनांक २ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाने रद्द केल्या आहेत,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सव्वा दोन वर्षाचा कालावधी उलटूनही अद्यापही आयोगावरील अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आयोगावरील नियुक्त्या करण्यात न आल्यामुळे त्याचा फटका शेतमालाचे भाव निश्चित न होऊन शेतकऱ्यांना बसत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर नियुक्त्या तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२०-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे, खरे नाही.
(५) नियुक्ती करणेची बाब शासनाच्या विचारधीन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिखली (जि.बुलढाणा) येथील अनुराधा नागरी सहकारी बँक लिमिटेड, चिखली यांनी कर्जवाटपात केलेला गैरव्यवहार

**(२६) ४६७३५ (०६-१०-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीने दिनांक २५.११.२०२० रोजीच्या अहवालात अनुराधा नागरी सहकारी बँक लि. चिखली, जि. बुलडाणा कॉ या बँकेच्या सन २००७-२००८ च्या लेखापरिक्षण अहवालामध्ये कृषी कर्ज रक्कम रुपये ८ लाख ५४ हजार रुपये एवढी दर्शविण्यात आलेली असताना प्रत्यक्षात सदर बँकेला कर्जमाफी योजनेअंतर्गत राज्य शासनाकडून ४५५ सभासदांचे रुपये ६६,९४,१३१/- व केंद्र शासनाकडून १२६७ सभासदांचे रुपये १,६८,१५,५८४/- असे दोन्ही कर्जमाफी योजनेअंतर्गत १७२२ सभासदांचे एकूण २,३५,०९,७१५/- रुपये इतक्या रक्कमेचा गैरवापर केलेली असुन त्यानुसार लेखापरिक्षण अहवालातील कृषीकर्ज रक्कम व प्रत्यक्ष कर्जमाफीचा लाभ यामध्ये विसंगती दिसून येत असल्याने अनुराधा नागरी बँकेने २,२६,५५,७१५ इतक्या रकमेचा अपहार केल्याचे स्पष्ट झाले आहे हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदर विसंगतीच्या अनुषंगाने सहकार आयुक्त कार्यालया मार्फत चौकशी करण्यासाठी तीन सदस्यीय चौकशी पथकाची नियुक्ती करण्यात आली असून त्याबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचा अहवाल मागविण्यात आला असून विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल असे सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनुराधा नागरी बँकेने भ्रष्टाचार केल्याचे सिध्द होऊनही आणि सरकारने मान्य करूनही अनुराधा नागरी सहकारी बँक लि. चिखली, जि. बुलडाणा यांच्या कडून अपहारीत रक्कम दंडनीय व्याजासह वसुली करुन संचालक मंडळावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी असताना ही शासनाने दोषींवर कोणतीही कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०९-१२-२०२२) :** (१) याप्रकरणी अद्याप चौकशी सुरु आहे.
(२) व (३) याप्रकरणी चौकशी पथक नियुक्त करण्यात आले आहे. तथापी अनुराधा नागरी सहकारी बँकेने मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपिठ नागपूर येथे दावा दाखल केला असून मा. उच्च न्यायालयाने चौकशी आदेशास स्थगिती दिली आहे. सदर स्थगिती आदेशाविरुद्ध शासनाची बाजू मा.उच्च न्यायालयात मांडण्यासाठी विशेष विधितज्ञाची (special consellor) नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पश्चिम घाटातील जंगले संरक्षित करण्याबाबत.**

**(२७) ४६९१० (२१-०९-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पश्चिम घाटात (सहयाद्री ) येथे पूर्वी ६७ टक्के जंगल असून आता केवळ ३७ टक्के जंगल शिल्लक असल्याचे दिनांक २२ जुलै,२०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३० टक्के जंगलापैकी केवळ १२ ते १५ टक्के जंगलच संरक्षित असून खाजगी जंगलक्षेत्र पूर्णपणे नष्ट झालेले आहे,त्यामुळे पश्चिम घाटाची स्थिती चिंताजनक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून या अतिसंवेदनशील भागातील जंगल वाचविण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-१२-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यातील पश्चिम घाटात समाविष्ट १२ जिल्ह्यांमध्ये India State of Forest Report २०११ व २०२१ च्या तुलनात्मक तक्त्यानुसार वनाच्छादनात ३८७ चौ.कि. वाढ झालेली आहे.

| एकूण भौगोलिक क्षेत्र सन २०११ (चौ.कि.) | एकूण वनाच्छादित क्षेत्र सन २०११ (चौ.कि.) (टक्केवारी) | एकूण वनाच्छादित क्षेत्र सन २०२१ (चौ.कि.) (टक्केवारी) | एकूण वाढ झालेले वनाच्छादित क्षेत्र (चौ.कि.) (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| १,१८,२३३ | २०,३७९ (१७.२३ %) | २०,७६६ (१७.५६ %) | ३८७ (०.३३ %) |

(३) अतिसंवेदनशील भागातील जंगल वाचविण्यासाठी वन विभागामार्फत खालीलप्रमाणे उपाय योजना करण्यात आली आहे:-

(अ) वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ अंतर्गत राष्ट्रीय उद्यान/ अभयारण्य/संवर्धन राखीव अधिसूचित करण्यात आलेले आहे.

(ब) संयुक्त वन व्यवस्थापन समित्या व विविध स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फत जनजागृती केली जाते.

(क) अवैध चराई, अवैध वृक्षतोड यावर नियंत्रण ठेवण्यासाठी क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी कार्यरत असून वनक्षेत्रात गस्तीची कामे केली जातात.

(ड) सह्याद्री व्याघ्र क्षेत्राभोवती पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (ESZ) निर्माण करण्याकरीता प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दर्यापूर (जि.अमरावती) येथील दुय्यम निरीक्षक कार्यालयाच्या इमारतीस बांधकाम व निधीसह मान्यता देण्याबाबत**

**(२८) ४७१८७ (१५-११-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर (जि.अमरावती) येथील दुय्यम निरीक्षक कार्यालयाची इमारत जुनी व मोडकळीस आली असून नवीन इमारत बांधकामाचा प्रस्ताव अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क अमरावती यांचेमार्फत आयुक्त राज्य उत्पादन शुल्क मुंबई यांचेकडे दिनांक २३/११/२०२२ रोजी वा त्यासुमारास सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी पहाणी करुन चौकशी करण्यात आली आहे काय, तसेच उक्त प्रस्तावास निधीसह मान्यता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (१९-१२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, दर्यापूर या कार्यालयाच्या नवीन इमारत बांधकामाचा प्रस्ताव आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयास दि.२१.०६.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे.
(२) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाने प्रस्तावाची छाननी केली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे इमारत बांधकामाचे सुधारीत नमुना नकाशे अंतिम करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी दुय्यम निरीक्षक, दर्यापूर कार्यालयाचे सुधारीत नमुना नकाशानुसार नव्याने अंदाजपत्रक सादर करण्याबाबत अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अमरावती यांना दिनांक ०७.१२.२०२२ च्या पत्रान्वये कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील अनेक पशु दवाखान्यातील लाखो मशीनींची दुरुस्ती व देखभाल करण्याबाबत**

**(२९) ४७२९७ (२६-१२-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारने २००७ मध्ये चार टक्के कृषी विकास निधीतून चांदूर रेल्वे, मोर्शी, अचलपूर येथे आजारी पशूंचे योग्य व अचूक निदान करण्यासाठी एक्स-रे व सोनाग्राफी मशीन दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मात्र गेल्या कित्येक दिवसांपासून अचलपूर येथील एक्स-रे व सोनाग्रार्फी मशीन बंद असल्याच्या तक्रारी पशुपालकांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन या मशीनींची दुरुस्ती देखभाल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२६-१२-२०२२) :** (१) सन २०११-१२ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत एक्स-रे व सोनोग्राफी मशीनचा पुरवठा अमरावती जिल्हयातील अचलपूर, चांदूर रेल्वे व मोर्शी येथील पशुवैद्यकीय दवाखान्यास करण्यात आलेला आहे.
(२), (३) व (४)तालुका लघु पशु सर्वचिकीत्सालय, अचलपूर येथील एक्स-रे मशीनमध्ये तांत्रिक बिघाड व एक्स-रे ट्युब डॅमेज झाल्यामुळे बंद होती. तथापि, सदर मशीन दुरुस्त करुन सुरु करण्यात आलेली आहे. सध्या सदर यंत्रसामुग्री सुरळीत सुरु आहेत.

---

**पुणे जिल्हयातील बारामती-फलटण-लोणंद आणि पुणे-मिरज रेल्वे मार्गासाठी सुरु करण्यात आलेल्या भूसंपादनाबाबत**

**(३०) ४७३४२ (०१-११-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील बारामती-फलटण-लोणंद व पुणे-मिरज रेल्वे मार्गासाठी लागणाऱ्या १८४ हेक्टर जमिनीपैकी १०० एकरपेक्षा अधिक क्षेत्राचे थेट खरेदीच्या माध्यमातून भूसंपादन करण्यात आले असल्याचे दिनांक ३१ मे, २०२२ रोजी वा

त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पासाठी उर्वरित जमीन कधीपर्यंत संपादित करण्यात येणार आहे तसेच संपादित शेतजमिनीचा मोबदला चालू बाजारभावानुसार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१) पुणे मिरज रेल्वे मार्गासाठी सांगली जिल्ह्यातील एकूण १४ प्रस्तावांमध्ये १४ गावातील भूसंपादनाखालील एकूण क्षेत्र ७.६९२९ हे.आर पैकी ६.१९८१ हे.आर एवढे क्षेत्र खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने संपादित करण्यात आले आहे.
(२) पुणे-मिरज रेल्वे मार्गासाठी उर्वरित संपादनाचे क्षेत्र १,४९४८ हे.आर पैकी ०.४०५ हे.आर क्षेत्राचे भूसंपादन अधिनियम,२०१३ अन्वये भूसंपादनाची कार्यवाही कार्यान्वित करण्यात आली असून सदर क्षेत्रासाठी SIA मधून मिळणेकरिता प्रस्ताव शासनास सादर केला आहे व उर्वरित क्षेत्राचे सर्व खातेदार व रेल्वे अधिकारी यांच्याशी समन्वय साधून थेट खरेदी करण्याची प्रक्रिया संबंधित भूसंपादन अधिकारी यांच्यामार्फत प्रगतीपथावर आहे. सांगली जिल्ह्यातील पुणे - मिरज रेल्वे मार्गासाठी भूसंपादनाची प्रक्रिया माहे सप्टेंबर अखेर पूर्ण होईल असे नियोजन करण्यात आले आहे. शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे,२०१५ या शासन निर्णयाचे अनुसरुन व जिल्हास्तरीय मूल्य निर्धारण समितीमध्ये मूल्य दर निश्चित केल्यानुसार मोबदला वाटपाची कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) अशी बाब नाही.

---

**राज्यातील राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे मद्य बनावट असल्याबाबतची तपासणीची यंत्रणा नसल्याबाबत**

**(३१) ४७३४८ (१५-११-२०२२). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे मद्य बनावट आहे की नाही हे तपासणीची यंत्रणाच नसल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बनावट मद्य विक्री होत असल्याची तक्रार कोठे करावी याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम होत असल्याने बनावट मद्यविक्री होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बनावट मद्यविक्री होत असल्याने राज्याचा महसूल घटत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी तपासणी यंत्रणा सुरू करण्याबाबत तसेच महसूलामध्ये वाढ होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (१३-१२-२०२२) :** (१) मद्य बनावट आहे की नाही हे तपासण्याची स्वतंत्र यंत्रणा राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे नाही. तथापि, राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत जप्त मद्याची तपासणी राज्य शासनाच्या अधिपत्याखालील हाफकीन इन्स्टीट्युट, मुंबई आणि न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा तसेच, शासनाने यासाठी प्राधिकृत केलेल्या मे. वसंतदादा शुगर इन्स्टीट्यूट, पुणे यांचेकडून केली जाते.
(२) हे खरे नाही.
बनावट अथवा अवैध मद्याबाबत तक्रार नोंदविण्यासाठी विभागामार्फत टोल फ्री क्र. १८००२३३९९९९ व व्हाट्सअॅप क्र. ८४२२००११३३ प्रसिद्ध करण्यात आला आहे. तसेच, यासाठी आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयात अविरत नियंत्रण कक्ष कार्यरत आहे.

(३) हे खरे नाही.
(४) मद्यातील भेसळ व तीव्रता ओळखण्यासाठी इलेक्ट्रॉनिक संयंत्रे खरेदी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वरुड व मोर्शी या वनपरिक्षेत्रातील अधिकारी कर्मचाऱ्याची निवासस्थाने व कार्यालयाच्या इमारती जीर्ण अवस्थेत असल्याबाबत

**(३२) ४७४१४ (२१-०९-२०२२). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोर्शी (जि.अमरावती) येथील वरुड व मोर्शी या दोन्ही ठिकाणी वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे कार्यालय असून सदरची दोन्ही कार्यालये व अधिकारी-कर्मचारी यांच्या निवासस्थानांची बांधकामे सुमारे ३० ते ३५ वर्षांपुर्वींची जुनी असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची बांधकामे जीर्ण अवस्थेत असून वापरास अयोग्य असल्याने या दोन्ही ठिकाणी कार्यालयीन इमारत व निवासस्थानची इमारत नवीन बांधकाम करणे आवश्यक असल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ३१ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिले असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, काय त्यानुषंगाने उपरोक्त दोन्ही ठिकाणी कार्यालयीन इमारत व निवासस्थानाची नवीन इमारत बांधण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-१२-२०२२) :** (१) अमरावती वनविभाग अंतर्गत वनपरिक्षेत्र अधिकारी वरुड यांचे कार्यालय वरुड येथे असून, वनपरिक्षेत्र अधिकारी मोर्शी यांचे कार्यालय वनपाल निवासस्थानामध्ये कार्यरत आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी वरुड व मोर्शी यांचेअंतर्गत एकूण कार्यालयीन आणि निवासस्थानांची अनुक्रमे २० व २६ इतकी संख्या असून त्यापैकी अनुक्रमे ८ व २२ इमारती सुमारे ३० ते ३५ वर्षापूर्वीच्या आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) मोर्शी वनपरिक्षेत्र कार्यालय इमारतीच्या बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून, वरुड व मोर्शी वनपरिक्षेत्रातील वापरास अयोग्य/नादुरुस्त इमारतीबाबतीत नवीन इमारती बांधणेकामी तसेच इमारतींची दुरुस्ती करण्याकरीता अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनातर्फे मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेतंर्गत रस्त्यांच्या वाढीव अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबत

**(३३) ४७५०४ (३१-१०-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनातर्फे शेतातील पाणंद रस्त्यांच्या विकासासाठी मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजना अंमलात आणली असून सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर मतदार संघातील एकूण २३ पाणंद रस्त्यांच्या कामास माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दर्यापूर व अंजनगाव सुर्जी ही दोन्ही तालुके खारपान पट्यांतील असल्याने शासन निर्णयानुसार अनुज्ञेय असलेले रुपये २३,८४,८५६ प्रती किमी प्रमाणे किंमतीत पाणंद रस्त्यांचे कामे होणे शक्य नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी पाणंद रस्त्यांचे वाढीवदराने अंदाजपत्रकासह प्रस्ताव सादर करण्याबाबत तत्कालीन रोजगार हमी योजना मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या दिनांक २६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या आढावा बैठकीत निर्देश दिल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच उक्त प्रस्तावास वाढीव दराने मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१३-१२-२०२२) :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दि.०३/०३/२०२२ अन्वये दर्यापूर मतदार संघातील २३ कामांचा मंजुर आराखडयात समावेश करण्यात आला आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) दर्यापूर मतदार संघतील शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांची अंदाजपत्रके शासनाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आलेली आहेत तसेच दिनांक २५/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मातोश्री ग्राम समृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत मंजुर आराखडयातील शेत/पाणंद रस्त्यांच्या अंदाजपत्रकांची छाननी करण्याकरीता छाननी समिती गठीत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आष्टी तालुक्यातील (जि.वर्धा) सामाजिक वनीकरण कार्यालयांतर्गत विठ्ठलापूर रोपवाटिकेत झालेला गैरव्यवहार

**(३४) ४७५३० (२५-०९-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी (जि.वर्धा) तालुक्यातील सामाजिक वनीकरण कार्यालयांतर्गत विठ्ठलापूर रोपवाटिकेत मनरेगाच्या कामावर पाच मजूर असताना हजेरीपटावर २५ मजूर दाखवून गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीमध्ये काय आढळून आले, त्याअनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

तथापि, सामाजिक वनीकरण विभाग, वर्धा अंतर्गत आष्टी वनपरिक्षेत्रातील विठ्ठलापूर रोपवाटीकेत "मनरेगाच्या कामावर पाच तर मस्टरवर दाखविले पंचवीस मजूर" या मथळयाची दिनांक २७.०४.२०२२ रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रात बातमी प्रकाशित झाली होती.
(२) वृत्त पत्रातील प्रकाशित बातमीच्या अनुषंगाने सहाय्यक वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), वर्धा यांच्या दिनांक २७.०६.२०२२ रोजीच्या चौकशी अहवालानुसार तसेच वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, नागपूर यांच्या दिनांक १०.०८.२०२२ रोजीच्या चौकशी अहवालानुसार, वृत्तपत्रात नमूद आरोपांच्या संदर्भात गंभीर व नियमबाह्य बाबी झाल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आले नाही. तसेच सदर रोपवाटीकेत मनरेगा कामांवर केवळ ५ मजूर काम करित असताना मस्टरवर २५ मजूर दाखवून गैरप्रकार झाल्याचे चौकशीअंती आढळून आलेले नाही.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## खानापूर, आटपाडी व तासगाव (जि.सांगली) तालुक्यातील पशुवैद्यकीय विभागात निम्म्याहून अधिक पदे रिक्त असल्याबाबत

**(३५) ४७७३३ (२८-१०-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर, आटपाडी व तासगाव (जि.सांगली) तालुक्यातील पशुवैदयकीय विभागात निम्म्याहून अधिक पदे रिक्त असून १ लक्ष ६५ हजार पशुधनाची जबाबदारी केवळ काही अधिका-यांवर असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत, तसेच ती पदे भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०१-२०२३) :** (१) सांगली जिल्ह्यामधील खानापूर, आटपाडी व तासगाव तालुक्यांतील पशुवैद्यकीय दवाखान्यातील मंजूर, भरलेली व रिक्त पदांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे-

| पद | मंजूर | भरलेली | रिक्त |
|---|---|---|---|
| सहायक आयुक्त पशुसंवर्धन | २ | १ | १ |
| पशुधन विकास अधिकारी | २३ | १५ | ०८ |
| सहायक पशुधन विकास अधिकारी | ०५ | ०४ | ०१ |
| पशुधन पर्यवेक्षक | २५ | ११ | १४ |
| एकूण | ५३ | ३० | २३ |

पशुवैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना नियमीतपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.

(२) व (३) विभागातील कार्यरत अधिकाऱ्यांची बदली, पदोन्नती तसेच सेवानिवृत्ती इ. कारणांमुळे पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून, लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यानंतर त्याद्वारे सदरहू रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे. राज्यात उद्भवलेल्या लम्पी चर्मरोग प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक बाब म्हणून पशुधन पर्यवेक्षकांची ११५९ पदे (राज्यस्तर २८६ व जिल्हा परिषदस्तर ८७३) आणि पशुधन विकास अधिकाऱ्यांची २९३ पदे बाह्य स्त्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यास शासन निर्णय दि. १६/०९/२०२२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये पदभरतीवरील निर्बंध शिथील करण्यात आल्यामुळे नवीन पदभरतीद्वारे गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे

---

## मातोश्री ग्राम समृद्धी शेत पाणंद रस्ता योजनेअंतर्गत जमीन मोजणीच्या कामासाठी कंत्राटी भूमापक यांची नियुक्ती करण्याबाबत

**(३६) ४७८१४ (०१-११-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मातोश्री ग्राम समृद्धी शेत पाणंद रस्ता योजना विविध योजनाच्या अभिसरणातून प्रभावीपणे अंमलबजावणीकरिता कंत्राटी पद्धतीने प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे लातूर जिल्ह्यात सेवानिवृत्त भूमापक किंवा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत पदवी प्राप्त झालेल्या प्रशिक्षणार्थी यांच्या नियुक्तीसाठी मानधनावर होणाऱ्या खर्चाच्या तरतुदीसह मंजुरी देण्याबाबत अप्पर मुख्य सचिव, रोजगार हमी योजना, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे जिल्हाधिकारी, लातूर दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ च्या पत्रान्वये मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने कंत्राटी भूमापक नेमणूकीस शासनास किती निधीची आवश्यकता लागणार असून रोजगार हमी योजनेंतर्गत नियुक्तीस निधीसह मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१३-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) मातोश्री ग्राम समृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत मंजुर आराखडयातील शेत/पाणंद रस्त्यांची तातडीची मोजणी भुमी अभिलेख कार्यालयामार्फत निशुल्क करावयाची आहे. तसेच खाजगी मोजणीधारकांकडुन मोजणी करीता लागणारा निधी अनुज्ञेय असल्याने संबंधीत कामांच्या अंदाजपत्रकात तो खर्च म्हणुन समाविष्ट करता येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मंदिरे व किल्ल्यांच्या जिर्णोद्वाराबाबत.**

**(३७) ४७८२८ (०४-११-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक प्राचीन मंदिरे तसेच किल्ल्यांचा जिर्णोद्वार हा पुरातत्व विभागाच्या धोरणांमुळे प्रलंबित असल्याचे दि.१६ मे,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे या प्रकरणी आवश्यक सहकार्य केंद्र शासन तसेच पुरातत्व विभागाकडून मिळावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येते आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०१-२०२३) :** (१)अशी बाब निर्दशनास आली नाही.
(२) मा. मुख्यमंत्री महोदयांनी राज्यातील प्राचीन मंदीरांचे जतन, संवर्धन व परिसर विकास कार्यक्रम राबविण्याची घोषणा केली आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात राज्यातील ८ प्राचीन मंदीरांच्या संवर्धनाचा प्रकल्प राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. या कामासाठी भारतीय पुरातत्व विभागाकडून विकास आराखडा तयार करण्यासाठी सहकार्य होत आहे.

राज्यातील गडकिल्ल्यांचे जतन व संवर्धनाच्या कामाचा तसेच त्या परिसरातील पर्यटनासाठी सुविधा निर्माण करणे व त्या परिसराचे जैवविविधता, जतन व वनीकरण करणे या करीता मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन केली आहे. प्रथम टप्प्यात राजगड, तोरणा, शिवनेरी (जि. पुणे), सुधागड (जि. रायगड), विजयदुर्ग, सिंधुदुर्ग (जि.सिंधुदूर्ग) या ६ किल्ल्यांची निवड केली आहे. भारतीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारीतील शिवनेरी, विजयदुर्ग व सिंधुदूर्ग या किल्यांच्या संवर्धनाचा साईट मॅनेजमेंट प्लान तयार करण्याची कार्यवाही करण्याकरीता भारतीय पुरातत्व विभागाची मान्यता मिळालेली आहे. यापैकी शिवनेरी व सिंधुदूर्ग या किल्ल्यांचा विकास आराखडा महानिदेशक, भारतीय पुरातत्व विभाग, नवी दिल्ली यांचेकडे सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वरवंड येथील वन उद्यान विकसित करण्याबाबत.**

**(३८) ४७८७६ (३१-१०-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वरवंड (ता.दौड, जि.पुणे) येथील वन विभागाच्या गट नं. २१०४ येथे वन उद्यान विकसित करण्याबाबत मा. लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ८ जुलै, २०२१ रोजी लेखी निवेदन वनपरिक्षेत्र अधिकारी, दौंड यांना दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी पर्यटकाची मोठ्या प्रमाणवर वर्दळ असते. त्याअनुषंगाने मा. लोकप्रतिनिधी यांनी मागणी केल्याप्रमाणे सदर ठिकाणी पर्यटन स्थळ व वन उद्यान विकसीत करण्यासाठी वनपरिक्षेत्र अधिकारी दौंड यांनी सदर ठिकाणाची पाहणी केली असुन, त्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत सद्यस्थिती काय आहे, प्रस्ताव शासनास कधी पर्यंत सादर करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) उक्त प्रस्ताव शासनास लवकरात लवकर सादर करण्याची प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी तजविज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा (जि.जळगाव) तालुक्यातील सातगाव (डोंगरी) येथील परिसरात अवैध वृक्षतोड होत असल्याबाबत.**

**(३९) ४७९११ (२५-०९-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि.जळगाव) तालुक्यातील सातगाव (डोंगरी) परिसरात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मोठया प्रमाणात अवैध वृक्षतोड केली जात असल्याचे दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे वृक्षतोड करणारे लाकूड तस्कर वृक्षतोडीस विरोध करणाऱ्यांना दमदाटी करत असल्याचे प्रकार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील अवैध वृक्षतोड रोखण्याबाबत व येथील लाकूड तस्करांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

मौजे सातगाव (डोंगरी) या गावात वनक्षेत्र नाही. श्री. अशोक मानखा तडवी, रा. सातगांव (डोंगरी), ता. पाचोरा यांनी दिनांक १२.०५.२०२२ रोजी गट क्र. १२७ क्षेत्र १.६२ हे.मौजा सातगांव (डोंगरी) येथील दफनभुमीतुन दोन झाडे अवैधरित्या तोडल्याबाबत पोलीस स्टेशन पिंपळगांव हरे, येथे वनगुन्हा दाखल करण्याबाबत तक्रार अर्ज केलेला होता. सदरहू तक्रार अर्ज पोलीस स्टेशन पिंपळगांव हरे यांनी वनक्षेत्रपाल ता. पाचोरा यांना दिनांक २९.०६.२०२२ रोजी वर्ग केल्यामुळे वनपरिक्षेत्र अधिकारी पाचोरा यांनी घटनास्थळी भेट दिली होती. त्यात त्यांनी तक्रारकर्ते श्री.अशोक मानखा तडवी, रा.सातगाव (डोंगरी) व श्री.सुभाष धनराज पाटील,सरपंच रा. सातगाव (डोंगरी) यांचा जबाब नोंद करुन सदर जागेचा पंचनामा करण्यात आलेला आहे. सदर जागेवर ०२ फापडा (फापडी)वृक्षाची विनापरवानगी वृक्षतोड झाल्याचे निदर्शनास आले असुन पाणीपुरवठा विहिरीस नुकसानदायक ठरत असल्याने ग्रामपंचायतीचा ठराव घेऊन सदर दोन वृक्षांची तोड केल्याचे सरपंच सातगाव यांनी जबाबात नमूद केले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) वनपरिक्षेत्र अधिकारी पाचोरा यांनी केलेल्या सदर घटनेच्या चौकशीत वनेतर क्षेत्रावर दोन वृक्षांची तोड केल्याने सरपंच रा. सातगाव यांचेकडून रुपये २०००/- इतका दंड वसुल करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच भारतीय वन अधिनियम १९२७ अन्वये विनापरवाना वाहतूक केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करुन संबधितांकडून रु.३०००/- तडजोड शुल्क वसूल करुन गुन्हा निकाली काढण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उरण (जि.रायगड ) येथील पाणथळ जमीन सिडकोने नष्ट केल्याबाबत

**(४०) ४७९८१ (२५-०९-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील उरण येथील सुमारे १५०० एकर पाणथळ जमिन सिडकोकडून नष्ट करण्यात आल्याची तक्रार "वनशक्ती" या पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील सेवाभावी संस्थेने कोकण विभागीय आयुक्त, वन विभाग यांच्याकडे माहे एप्रिल व मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उर्वरित पाणथळ जागा वाचविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-१२-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.
रायगड व उरण येथील १५०० एकर जमीन नष्ट झाल्यासंदर्भात "वनशक्ती" या पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील सेवाभावी संस्थेकडून विभागीय आयुक्त, कोंकण तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांच्याकडे दिनांक १५.५.२०२२ रोजी ई-मेल व्दारे तक्रार प्राप्त झालेली आहे.
प्रस्तूत तक्रारीच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी उरण, तलाठी सजा डोंगरी, वनपाल, परिक्षेत्र अधिकारी कार्यालय उरण, वनरक्षक कांदळवन उरण, वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय उरण यांच्याकडून चौकशी करण्यात आली आहे. चौकशीअंती मौजे पाणजे, मौजे भेंडखळ, मौजे सावरखोर व मौजे जासई येथे भराव केल्याचे आढळून आले नाही.
राज्यातील पाणथळ जागांच्या संरक्षणासाठी महाराष्ट्र राज्य वेटलँड प्राधिकरण तसेच त्याअंतर्गत तांत्रिक समिती व तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक २.९.२०१६ अन्वये कोंकण विभागातील वेटलँडसंदर्भात विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली पाणथळ तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्हयात पशुधन विकास अधिकाऱ्यांची १७ तर पर्यवेक्षकांची २४ पदे रिक्त असल्याबाबत

**(४१) ४८१३६ (३०-१०-२०२२). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयात पशुधन विकास अधिका-यांची १७ तर पर्यवेक्षकांची २४ पदे रिक्त असल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयात साडेसात लाख जनावरे असतांनाही ३१ पशुधन विकास अधिकारी व ५० पर्यवेक्षक उपचारासाठी उपलब्ध असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय, ,
(३) असल्यास, जिल्हयात पशुधन विकास अधिका-यांची व पर्यवेक्षकांची पदे रिक्त राहण्यामागची कारणे काय आहेत तसेच याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. १२६ (२८)

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०१-२०२३) :** (१) व (२) उस्मानाबाद जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागातील मंजूर, भरलेली व रिक्त पदांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे-

| पद | मंजूर | भरलेली | रिक्त |
|---|---|---|---|
| सहायक आयुक्त पशुसंवर्धन | ०८ | ०५ | ०३ |
| पशुधन विकास अधिकारी | ५७ | ४१ | १६ |
| सहायक पशुधन विकास अधिकारी | २२ | १९ | ०३ |
| पशुधन पर्यवेक्षक | ७९ | ५३ | २६ |
| कंत्राटी पशुधन पर्यवेक्षक | २८ | २७ | ०१ |

रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना नियमीतपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत. तसेच उस्मानाबाद जिल्ह्यात एकूण २८ कंत्राटी पशुधन पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून, पैकी २७ कंत्राटी पशुधन पर्यवेक्षक रुजू झाले आहेत.

(३) व (४) विभागातील कार्यरत अधिकाऱ्यांची बदली, पदोन्नती तसेच सेवानिवृत्ती इ. कारणांमुळे पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून, लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यानंतर त्याद्वारे सदरहू रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.

बाह्य स्त्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात २६२ पशुधन पर्यवेक्षकांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आलेली आहेत. तदनंतर राज्यात उद्भवलेल्या लम्पी चर्मरोग प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक बाब म्हणून पशुधन पर्यवेक्षकांची ११५९ पदे (राज्यस्तर २८६ व जिल्हा परिषदस्तर ८७३) आणि पशुधन विकास अधिकाऱ्यांची २९३ पदे बाह्य स्त्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यास शासन निर्णय दिनांक १६/०९/२०२२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये पदभरतीवरील निर्बंध शिथील करण्यात आल्यामुळे नवीन पदभरतीद्वारे गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.

---

## जिल्हा जालना येथील पशुसंवर्धन विभागातील विविध योजनांचा लाभ मिळण्याबाबत

**(४२) ४८१८९ (३०-१०-२०२२). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना येथील राज्यातील पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पशुपालक शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जालना जिल्ह्यातील सुमारे ४७ हजाराच्या आसपास शेतकऱ्यांनी पशुसंवर्धन विभागाच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर केला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पशुसंवर्धन विभागाने जालना जिल्ह्याचा लक्षांक कमी असल्यामुळे त्यांना या योजनेपासून वंचित राहावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, शासनाने पशुसंवर्धन विभागातील विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळावा याकरिता जालना जिल्ह्याचा लक्षांक वाढवून देण्याची व गोरगरीब पशु पालकांना न्याय मिळवून देण्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांनी सबंधीत विभागाकडे वारंवार मागणी केलेली आहे परंतु शासनाने अद्याप कोणतीच उपाय योजना केली नाही हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास,उपरोक्त जिल्हयातील लक्षांक वाढीव प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२६-१२-२०२२) :** (१) व (२) होय.
(३) योजनांच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यांना प्रत्यक्ष वितरित करण्यात आलेल्या निधीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. तसेच, उर्वरित प्रतिक्षाधीन अर्जदारांची यादी सन २०२५-२६ पर्यंत ग्राहय धरण्यास मान्यता देण्यात आलेली असल्यामुळे योजनेचा लाभ मिळण्यापासून वंचित रहावे लागत नाही.
(४), (५) व (६) शासन निर्णय दिनांक १५.१०.२०१६ अन्वये मराठवाडा पॅकेज अंतर्गत जालना जिल्हयासाठी १००० दुधाळ गाय गट (२ देशी /संकरीत गायी), १००० म्हैस गट (२ म्हशी) तसेच, १००० शेळी गट (२० शेळया +२ बोकड) वाटप करणे ही विशेष योजना मंजूर असून या अंतर्गत सन २०२२-२३ पर्यंत दुधाळ गाय गट ( २ देशी / संकरीत गायी), म्हैस गट (२ म्हशी) वाटपासाठी रु. ८२७.०० लक्ष तसेच, शेळी गट (२० शेळया + २ बोकड) वाटपासाठी रु. ७२२.०० लक्ष निधी मंजूर करण्यात आलेला आहे. त्यामुळे जालना जिल्हयातील पशुपालकांसाठी मराठवाडा पॅकेज अंतर्गत अतिरिक्त योजना व निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

---

## अंबाजोगाई, (जि. बीड) शहरातील तलाठी यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार असतांना त्यांच्या कार्यकाळातील कामांची चौकशी करणेबाबत.

**(४३) ४८३४२ (२२-०७-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई शहर तलाठी कार्यालयाचा अतिरिक्त कार्यभार तहसीलदार यांनी वादग्रस्त तलाठी श्री, युवराज सोळुंके यांच्याकडे दिला होता. हे अंबाजोगाई शहर तलाठी कार्यालयात ज्या तारखेला रुजू झाले त्या तारखेपासून त्यांच्या कार्यकाळात किती फेरफार झाले, तसेच ज्या ७/१२ चे क्षेत्र जुळत नाहीत व ऑनलाईन झालेले नाहीत त्याची फेरफार मागील दोन वर्षापासून होत नाहीत. त्यामुळे नागरिक त्रस्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तलाठी यांनी रजेचा अर्ज दिल्यानंतर त्यांनी काही फेरफार केले व रजेवर असतांना शासकीय कामकाज करता येते का, याबाबत चौकशी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे महसूलमंत्री व तहसीलदार अंबाजोगाई यांच्याकडे दिनांक २२ फेब्रुवारी २०२२ व २ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे केली होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्या अनुषंगाने तहसीलदार, अंबाजोगाई. यांनी सदर प्रकरणी चौकशीसाठी दिनांक १३ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास पथक नेमून नायब तहसीलदार श्री, सरोदे यांची पथक प्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली होती व त्यांना ०७ दिवसाच्या आत तपशीलवार अहवाल सादर करण्याबाबत आदेशित केले होते हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी नायब तहसीलदार यांनी वेळेत अहवाल सादर न केल्याने तहसीलदार, अंबाजोगाई. यांनी दिनांक १० जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्मरणपत्र देऊन अहवाल सादर करण्याचे आदेशित केले होते हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अहवाल वेळेत सादर न केल्याने तहसीलदार अंबाजोगाई यांनी कोणती कठोर कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-११-२०२२) :** (१) तलाठी सजा अंबाजोगाईचे नियमित तलाठी रजेवर असल्याने, प्रशासकीय कारणास्तव सदर तलाठी सजाचा अतिरिक्त कार्यभार श्री.युवराज सोळंके यांना देण्यात आला, हे खरे आहे. त्यांच्या कार्यकाळात एकूण ३०० फेरफार घेण्यात आलेले आहेत.

अंबाजोगाई शहर येथील गा.न.नं.७/१२ संगणकीकरणात त्रुटी असून तसेच दिनांक २३/०४/२०११ रोजी तहसिल कार्यालय अंबाजोगाई येथील अभिलेख कक्षास लागलेल्या आगीमुळे मुळ अभिलेख जळाले असल्यामुळे अभिलेख उपलब्ध नसणे, त्याचप्रमाणे ऑनलाईन विविध तांत्रिक अडचणींमुळे अंबाजोगाई शहरातील गा.न.नं.७/१२ उताऱ्यांचे क्षेत्र जुळत नाहीत. सबब, जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक ०४/०३/२०२२ अन्वये, सदरच्या तांत्रिक अडचणी दुर करण्यासंदर्भात Edit Module सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख पुणे

यांना कळविले असून गा.न.नं.७/१२ उतारे जुळविण्याचे काम करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणाची चौकशीकरीता पथक नेमण्यात आले होते. मात्र, संबंधित तलाठी यांनी सदर पथकास चौकशी कामी अभिलेख उपलब्ध न करुन देणे, विलंब लावणे यामुळे चौकशी पथकास अहवाल सादर करण्यास ७ दिवसापेक्षा अधिक विलंब झाला आहे. तथापि, त्यानंतर चौकशी पथकाने त्यांचा चौकशी अहवाल दिनांक २८/०७/२०२२ रोजी सादर केला आहे.

त्यानुसार संबंधित तलाठी यांनी रजेवर असतांना एकूण-२९ फेरफार ऑनलाईन मंजुरीस्तव टाकल्याचे निदर्शनास आले आहे. सदरील २९ फेरफारांपैकी २६ फेरफार मंजूर झालेले आहेत व ३ फेरफार नामंजूर झालेली आहेत. तसेच संबंधित तलाठ्याने चौकशीकामी पथकास अभिलेख उपलब्ध करुन न देणे ही बाब कार्यालयीन संहितेस धरुन नसून कर्तव्यात कसूर करुन व कार्यालयीन शिस्तीचा भंग करणारी असल्याने संबंधित तलाठ्याविरुध्द म.ना.से (शिस्त व अपील) नियम-१९७९ नुसार शिस्तभंगविषयक कार्यवाहीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

---

## अंबाजोगाई (जि. बीड.) तालुक्यातील तलाठी यांनी वाटणीपत्रकाच्या नोंदी बॉर्डावर घेऊन शासनाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान केल्याबाबत

**(४४) ४८३५१ (२२-०७-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंदू एकत्र कुटुंबाच्या मिळकतीची वाटणी होऊन सहधारकास मिळकत प्राप्त होणे ही प्रक्रिया हस्तांतरण या संज्ञेखाली येत नसून अशा वाटणीपत्राची नोंदणी करणे सक्तीचे नसल्याने अशा प्रकारच्या वाटणीपत्रावर मुद्रांक अधिनियमाच्या अनुसूची-१ मधील अनुछेद-४६ प्रमाणे मुद्रांक शुल्क देय असून महसूल व वन विभाग शासन परिपत्रक नोंदणी-१०९३/२४८४/प्रक्र ८२१/म-१ दि. २७/०३/१९९५ व मुद्रांक/१०९३/प्रक्र.६८१ दि. २६/०५/१९९५. व महाराष्ट्रा शासन परिपत्रक विपअर्ज /२०१७ /८४१/प्रक्र १८६/म-१ दि. २१/०४/२०१८ आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंबाजोगाई (जि. बीड) तालुक्यातील श्री.नाना लाड (तलाठी), साकुड, हे ज्या ठिकाणी कार्यरत होते त्या ठिकाणी त्यांनी वाटणीपत्रकाच्या नोंदी बॉर्डावर घेऊन शासनाचा मुद्रांक शुल्क भरून न घेता वाटणीच्या नोंदी घेतल्या आहेत. त्यामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणत आर्थिक नुकसान झाले त्यामुळे उक्त तलाठी यांचेकडून सदर रक्कम तातडीने भरून घेण्याबाबत त्वरित कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२९-१२-२०२२) :** (१) होय.
(२) होय.
(३) तहसिलदार अंबाजोगाई यांनी श्री. अनिल उर्फ नाना विश्वनाथ लाड, तलाठी यांच्या कार्यकाळातील प्रकरणांची चौकशी करुन त्यांच्या कामकाजातील निष्काळजीपणा व अनियमीततेबाबत त्यांचे विरुदध म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ चे नियम ३ व म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही अनुसरणेबाबत प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांना दिनांक १७/०८/२०२२ रोजी सादर केला आहे.

---

**गडचिरोली जिल्हयात पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४५) ४८८२७ (३०-१०-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरखेडा, कोरची, आरमोरी, देसाईगंज व धानोरा (जि.गडचिरोली) या पाच तालुक्यातील पशु संवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकाऱ्यांसह ५० टक्यापेक्षा अधिक पदे रिक्त असल्याचे माहे जुन, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०१-२०२३) :** (१) गडचिरोली जिल्ह्यामध्ये पशुसंवर्धन विभागातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची मंजूर पदांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे-

| पद | मंजूर | भरलेली | रिक्त |
|---|---|---|---|
| सहायक आयुक्त पशुसंवर्धन | ०४ | ०२ | ०२ |
| पशुधन विकास अधिकारी | ४४ | २२ | २२ |
| सहायक पशुधन विकास अधिकारी | १३ | १३ | - |
| पशुधन पर्यवेक्षक | २७ | २२ | ०५ |
| कंत्राटी पशुधन पर्यवेक्षक | २१ | २१ | - |
| व्रणोपचारक | १९ | ०८ | ११ |
| परिचर | ५९ | ५४ | ०५ |
| एकूण | १८७ | १४२ | ४५ |

विभागातील कार्यरत अधिकाऱ्यांची बदली, पदोन्नती तसेच सेवानिवृत्ती इ. कारणांमुळे पदे रिक्त आहेत. तथापि पशुवैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना नियमीतपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.

(२) व (३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून, लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यानंतर त्याद्वारे सदरहू रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे. राज्यात उद्धवलेल्या लम्पी चर्मरोग प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक बाब म्हणून पशुधन पर्यवेक्षकांची ११५९ पदे (राज्यस्तर २८६ व जिल्हा परिषदस्तर ८७३) आणि पशुधन विकास अधिकाऱ्यांची २९३ पदे बाह्य स्त्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यास शासन निर्णय दि. १६/०९/२०२२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये पदभरतीवरील निर्बंध शिथील करण्यात आल्यामुळे नवीन पदभरतीद्वारे गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे

---

**भुसावळ शहरात महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी छापे टाकून अवैध वाळूसाठा केल्याबाबत**

**(४६) ४८९६३ (०३-११-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ शहरात महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी १६ ठिकाणी छापे टाकून ५०२ ब्रास अवैध वाळूसाठा पकडल्याचे माहे २३ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध वाळू साठा करणाऱ्यांना महसूल विभागाने नोटीस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास , अवैध वाळू साठा करणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) जिल्हास्तरीय पथकाने, तसेच निवासी नायब तहसिलदार व तलाठी यांनी दिनांक २३/६/२०२२ रोजी भूसावळ शहरात सुरु असलेल्या बांधकामांच्या ठिकाणी आढळून आलेल्या वाळूसाठ्यांची तपासणी करुन एकूण १७ ठिकाणी ५२४ ब्रासचा अवैध वाळूसाठा जप्त केला आहे.

सदर १७ ठिकाणापैकी १४ वाळूसाठाधारकांना कारणे दाखवा नोटीस काढून मागविण्यात आलेले खुलासे अमान्य करुन त्यांचेविरुद्ध एकूण रक्कम रुपये १,०९,४४,०६५/- इतक्या दंडात्मक रकमेचे आदेश पारीत केले असून त्यांचेकडून वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

उर्वरित ३ वाळूसाठ्यास (४६ ब्रास) मालक नसल्याने सदर वाळूसाठा शासकीय कामास उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तेल्हारा (जि.अकोला) येथील पाणंद रस्त्यावर मुरुम टाकण्यासाठी परवानगी नसल्याने अनेक पाणंद रस्त्यांची कामे रखडल्याबाबत

**(४७) ४८९८९ (३०-१०-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हारा (जि.अकोला) येथील पाणंद रस्त्यावर मुरुम टाकण्यासाठी परवानगी नसल्याने अनेक पाणंद रस्त्यांची कामे रखडल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ३४ गावात पाणंद रस्ते नसल्याने शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी अनेक समस्याचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी प्रलंबित पाणंद रस्ते पावसाळ्यापूर्वी करुन देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१३-१२-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
एकुण ३४ पैकी २१ कामांचे मातीकाम पूर्ण झाले आहे.
(३) मुरुम उपलब्ध करुन त्याकरीता फ्री पासेस उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) निरंक.

---

## नागपूर येथील प्रशासकीय इमारतीला निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(४८) ४९२१५ (१४-१०-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या उपराजधानीला साजेल अशा भव्य प्रशासकीय इमारतीचे बांधकाम नागपूर येथे करण्यासाठी २५० कोटी रुपये उपलब्ध करून देण्याचे सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर करताना प्रस्तावित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

२) असल्यास, सदरहू प्रकरणी सव्वा वर्षाचा कालावधी होऊनही या कामासाठी अद्यापी निधी उपलब्ध नसल्याने तसेच सदर इमारतीचे नकाशे व अंदाजपत्रके तयार होऊनही निधी अभावी काम सुरू होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,
३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर इमारतीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नव्या इमारत बांधकामाचा रुपये २५१.५२ कोटी रकमेचा प्रस्ताव शासन स्तरावर प्राप्त असून प्रस्तावाची तांत्रिक छाननी मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्यामार्फत सुरु आहे. तद्नुसार परिपुर्ण प्रस्तावास कामाची निकड व निधीची उपलब्धता विचारात घेऊन प्रशासकीय मान्यतेनंतर निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड येथे कृषि विद्यापीठ व महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद पूणे, यांच्या शिफारशी नुसार येथे शासकीय कृषि महाविद्यालय स्थापन करण्यात मंजूरी देण्याबाबत

**(४९) ४९४३४ (०७-११-२०२२). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील सिंचनाच्या व आधूनिक शेतीच्या सूविधा विचारात घेता सदर जिल्ह्यात विद्यार्थ्यांचा कृषि शिक्षणाकडे मोठ्या प्रमाणावर ओढा असल्याचे दिसून येते, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी कृषितंत्र विद्यालय व कापूस संशोधन केंद्राची मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध असून विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने येथे कृषि महाविद्यालय सूरु करण्यास मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद पूणे यांनी देखील नांदेड येथे कृषि महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता देऊन शासनाकडे शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कृषि विद्यापीठ व महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद पूणे, यांच्या शिफारशी नुसार नांदेड येथे शासकीय कृषि महाविद्यालय स्थापन करण्यात मंजूरी देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०७-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत नांदेड येथे शासकीय कृषि महाविद्यालय स्थापन करण्याबाबत महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या दिनांक २२/२/२०२१ रोजी झालेल्या १०४ व्या बैठकीत ठराव क्र.०७/१०४/, दिनांक २२/०२/२०२१ नुसार ठराव संमत करून याबाबतचा प्रस्ताव शासनास शिफारशीत केला आहे. त्यानुषंगाने नांदेड येथे शासकीय कृषि महाविद्यालय स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास सादर केला असता डॉ.एस.एस.मगर समितीच्या शिफारशीनुसार कृषि शिक्षणाच्या बृहत आराखड्याबाबतचा मंत्रिमंडळ प्रस्ताव मान्य होईपर्यंत कोणतेही नवीन महाविद्यालय स्थापन करण्याबाबतचे मंत्रिमंडळ प्रस्ताव वित्त विभागास सादर करू नयेत असे अभिप्राय वित्त विभागाने दिले आहे.

कृषि शिक्षणाचा बृहत आराखडा प्रस्ताव अद्याप अंतिम झालेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या एकूण क्षेत्रापैकी २१% क्षेत्र असणाऱ्या मराठवाड्यामध्ये पाण्याच्या उपलब्धतेअभावी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५०) ४९४३८ (०४-११-२०२२). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात पाण्याच्या उपलब्धते अभावी शेती नापीक होण्याचे प्रमाण वाढत आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसंतराव नाईक कृषि विद्यापीठाकडे शेकडो एकर जमीन पडीक असूनही विद्यापीठा कडून या क्षेत्रामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने कोणतेही प्रयत्न करण्यात येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या एकूण क्षेत्रापैकी २१% क्षेत्र असणाऱ्या मराठवाड्यामध्ये कृषि क्षेत्र टिकवून ठेवण्यासाठी शासनाने सिंचन अनुशेषासह इतर कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार कृषी क्षेत्राकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०९-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही. सिंचनाअभावी उत्पन्नात घट येते, जमिन नापिक होत नाही.

(२) हे खरे नाही.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठास सन २०२२-२३ या वर्षात कृषि उन्नतीला उपयोगी ठरेल अशा संशोधनासाठी रु.२५ कोटी संशोधन निधी अर्थसंकल्पीत केला आहे. सदर संशोधन निधीतून कोरडवाहू फळपीकांच्या (उदा.सीताफळ व इतर सीताफळवर्गीय ) फळपीकांच्या संशोधनाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून कोरडवाहू व डोंगराळ भागातील पडीक क्षेत्र कोरडवाहू फळपिकाच्या लागवडीखाली आणण्यासाठी संशोधन निधीतून निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

(३) व (४) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठास शेतकरीभिमुख प्रकल्प राबविण्याकरीता कृषि विषयक संशोधन व शिक्षण या मुख्य लेखाशिर्षाअंतर्गत विविध लेखाशिर्षाखालील उद्दिष्टांकरीता राज्यशासनाकडून सहायक अनुदान वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(५) संबंधीत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.